भाग ३

प्रकरण तिसरे

"विविध नातीगोती व मानसिक तणाव"

# भाग ३

## प्रकरण तिसरे

### प्रास्ताविक:

ग्रामीण जीवनामध्ये कुटुंबरचनेला फार महत्त्वाचे स्थान असते. बहुधा एकत्र कुटुंब पध्दतीचा अवलंब सर्वत्र केलेला असतो. त्यामुळे घरात आजा, आजी, चुलते, चुलत्या, नणंदा, दीर, भावजया, जावा, सासू, सासरे या सगळ्यांचा वावर असतो. सणा समारंभात उत्सवात आजारपणात दु:खात सगळेजण एकमेकांना मदत करीत असतात. कर्त्या पुरुषाच्या मागे सगळेजणच उभे राहतात. समजा एखादा निर्णय फारसा सुखकारक नसला तरीही निमूटपणे तो मानावा लागतो. नात्यागोत्यालाही फार महत्त्व असते. मानपान खूप संभाळला जातो. ऐपत असो की नसो आपापल्या कुवतीप्रमाणे जावयाचे स्वागत केले जाते. मुलीची बोळवण केली जाते. सर्वांचा पाहुणचार आदबीने केला जातो. नात्यांना खूप जपले जाते. पण कधी कधी परिस्थितीच्या रेटयामुळे या नात्यांवरही ताण येऊ लागतात. कौटुंबिक संघर्ष सुरु होतात. लेकीला त्रास होतो. सुनेला जाच होतो. सासरा-जावई, जावई-मेहुणा यांच्यात शाब्दिक खटके उडू लागतात. कधी व्याही-व्याहीच भांडत बसतात. त्यात तरुण मुला-मुलींच्या भावनांकडे दुर्लक्ष होत राहाते. व त्यातूनही वेगळ्याच संघर्षाची सुरुवात होते.

ग्रामीण जीवनात परिस्थितीमुळे वेगवेगळया नात्यांच्या व्यक्तींच्या मनामध्ये कोणत्या प्रकारचे तणाव निर्माण होतात याचे चित्रण बोराडे यांच्या अनेक कथांमधून पहावयास मिळते. अशा कथांचा विचार प्रस्तुत प्रकरणामध्ये केलेला आहे.

## प्रकरण तिसरे

### विविध नातीगोती व मानसिक तणाव

ग्रामीण समाजरचनेत पुरुषसत्ता व एकत्र कुटुंबपध्दतीच अधिक्याने आढळते. घरातील सणावार, आजारपण, उत्सव, यात्रा, आहेर, लग्न या सर्व बाबी कारभारी पहात असतो. त्याच्यावरही ताण येईल अशी परिस्थिती कधी कधी निर्माण होते. घरात अचानकपणे आजारी पडलेल्या माणसाला तालुक्याला दवाखान्यात हलवण्याची तयारी करताना जर पहिल्यांदा जावई घरी आला तर त्या घरातील कर्त्या पुरुषाची मोठीच अडचण होते. याचे चित्रण "गाठोडं" या कथेत पहावयास मिळते.

वास्तविक जनाई आजारी आहे. तरीही तिला पाहण्यासाठी पहिल्यांदा जावई आला याचे प्रचंड दडपण आजारी जनाईपासून ते सासरा, मेहुणा यांच्यावर येते. अशा वेळी आहेर करण्याची एक रीत ग्रामीण समाजात आहे. पहिल्यांदा जावई येणे म्हणजे त्याचा आदर सत्कार तर यथास्थित करावाच लागतो. शिवाय आपल्या ऐपतीप्रमाणे आहेरही करावा लागतो. पण जिथे सगळे घरच जनाईच्या आजाराने काळवंडून गेले आहे तिथे या गोष्टी निघूच नयेत असा शहरी विचार आपल्या मनात येतो. पण प्रत्यक्षात समाजातील चालीरीतींचा, रूढींचा एवढा जबरदस्त प्रभाव असतो की त्याच्यापुढे सगळ्यांनाच शरण यावे लागते.

याशिवाय जनाईच्या मनात आणखी एक भीती आहे की, समजा आपण जावयाला आहेर कौरे केला नाही तर तो आपल्या लेकीला रुक्मिणीला "जाळभाज" करील. म्हणजे जर आपण काही करु शकलो नाही. ऐपत

नसली किंवा तशी पिरिस्थती नसली तरीही या सर्वांवर मात करून, या अडचणीतून वाट काढीतच हा आहेराचा विधी पार पाडावा लागतो. मायेपोटी या गोष्टी होतात हे गृहीत धरले तरी समाजमनाची धास्ती सतत वाटत रहाते. म्हणूनच जनार्दला तालुक्याच्या सरकारी दवाखान्यात नेण्यासाठी जी गाडी जुंपलेली आहे त्यातूनच जावयाच्या आहेराचे कपडे आणण्यासाठी लिंबाजी-रावांना जावे लागते. याला पार्श्वभूमी अशी आहे की पूर्वी बोळवणीच्या वेळेला काही गोष्टी कमी पडल्या होत्या तेव्हा जावयाने बरीच आदळआपट केलेली असते. म्हणजे त्या गोष्टीचा संदर्भ आधीच असल्याने जावई-सासरा, जावई-मुलगी यांच्यातील नात्यावर तणाव येऊ नये याची काळजी सतत घेतली जात आहे. प्रत्यक्ष मुलीचाही विचार हाच आहे की, ही वेळ आहेर स्वीकारण्याची नाही. पण ती हे नव-याला सांगू शकत नाही. कारण तिच्यापुढे तर दुहेरी पेच आहे. एकीकडे आई, वडील, भाऊ यांची असहायता तिला दिसते आणि दुसरीकडे नव-याचा अडेलपणाही तिला परिचयाचा आहे. त्यामुळे भाऊ गंगाराम तिलाच दोष देतो की अशा वेळेला तू त्यांना कशाला घेऊन आलीस. तू एकटी आली असती तर चालले असते. रुक्मिणीला वाटते आई बरी व्हावी. बाकी पुढचे पुढे. यासाठी काही सोसण्याची तयारीही तिने आपल्या मनाशी केलेली आहे. पण लिंबाजीराव व गंगाराम यांना मायच्या दुखण्यापेक्षा जावयाचा आहेर महत्त्वाचा मानावा लागतो.

परिस्थितीनेच हे सारे निर्माण केलेले आहे हे मान्य केले तरी याची बीजे ग्रामीण समाजव्यवस्थेमध्येच आहेत. परंपरागत पध्दतीने जगणा-या इथल्या माणसांना जुन्याप्रमाणेच पुढे चालत रहावेसे

वाटणे अगदी स्वाभाविक आहे. आपला काही भरवसा नाही. आपल्या डोळ्यादेखत जावयाचे व लेकीचे कौतुक आपण पहावे अशीही आईची इच्छा आहे. म्हणजे एकीकडे आईला हे हवे आहे. या ही परिस्थितीत आपल्यापेक्षा जावयाला जपणे तिला गरजेचे वाटते आहे. तर लिंबाजीराव म्हणतात,"बिन इलाजी गोष्ट हाय. आपुन तरी काय करावं ? " इथे त्यांची अगतिकता आहे. सासरा आणि जावई यांच्यातील संघर्ष कसा जीवघेणा असतो तेही या कथेत दिसते. "बोळवण", आहेर ही स्त्रीच्या नावाखाली चाललेली सक्तीची वसुलीच असते.

ही नाती जपायची आहेत ती केवळ स्त्रीने सांगितली म्हणूनच का ? की यापेक्षा काही खोल अर्थ त्यामध्ये आहे ? यातून कुणालाच सुख लागणार नसेल तर या नात्यांच्या जंजाळात अडकायचेच कशाला ? असले प्रश्न कुणालाच पडत नाहीत. कारण परंपरावादी समाज. या कथेत खरे दडपण येते ते सासरे लिंबाजीराव यांच्या मनावरच. एकीकडे समाजाच्या दडपणाची त्यांना भीती असते तर दुसरीकडे परिस्थितीतून वाटही काढायची असते. परंपरागत स्त्रीच्या चक्रात इथला माणूस सापडतो. त्यातून त्याची सुटकाच होणे अवघड होऊन बसते. आणि त्याचा तणाव जावई-सासरा यासारख्या नाजूक नात्यावरही येत रहातो. मा.ना. कागणे यांनी म्हटले आहे की, "'गाठोडं" ही एकच कथा 'जावई-सासरा-सून' हे नातेसंबंध कसे नाजूक अतूट असतात ते सांगण्यास पुरेशी आहे." हे पटायला लागते.

ग्रामीण सांस्कृतिक जीवनामधल्या काही वैशिष्टयपूर्ण गोष्टी आहेत. लग्न जमविणे, लग्न थाटात करणे, मुलीच्या गर्भारपणात डोहाळजेवण करणे, त्यानिमित्ताने पुन्हा जावयासह मुलीला कपडे

घेणे वगैरे. या सगळ्या गोष्टी समूहाला साक्षी ठेवून केल्या जातात. खेडयाची कल्पनाच मुळी एका बृहत् कुटुंबाची असल्याने सगळ्या गावाला अशा विधी, समारंभामध्ये सामील करुन घेतले जाते. माणसांच्या गाठीभेटी होतात. एकमेकांची खबरबात कळते. पिक-पाण्याच्या गप्पाही होतात.

एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये कारभारी हा सर्वेसर्वा असतो. त्यामुळे त्याच्या निर्णयापुढे सगळ्यांना मान तुकवावी लागते. यातूनही सूक्ष्म तणाव निर्माण होतात आणि कुटुंबाचे स्वास्थ्य बिघडते. "डोहाळजेवण" या कथेतील तणाव चुलत सासरा आणि जावई यांच्यातल्या अप्रत्यक्ष संघर्षाचा आहे.

गंगाच्या डोहाळजेवणाचा आहेर घेऊन गंगाचे वडील येण्याऐवजी गंगाचे चुलते तात्या येतात. ते घराचे कारभारी असतात. तात्या स्वभावाने थोडेसे हट्टी आहेत. जावयाने पाहुण्यांना आपणाला घडयाळ हवे असे अप्रत्यक्षपणे आधीच सुचवून ठेवलेले असते. ग्रामीण कुटुंबरचनेमध्ये सास-याकडून काही मागून घ्यायचे असेल तर आधी एकांतात बायकोकडे ही बाब पोचविली जाते. ती माहेरच्यांना निरोप देते.

बोराडे यांचे निरीक्षण अतिशय सूक्ष्म आहे. त्यामुळे खेडयातला समाज, त्यातले कुटुंब आणि त्या कुटुंबातल्या रीतीरिवाजाच्या कल्पना राबविण्याचे हरप्रयत्न त्यांना माहीत असल्याने कथेत जे तपशीलाचे बारकावे येतात त्यांनीच कथेला वास्तववादी केलेले असते.

वास्तविक डोहाळजेवण गंगाचे आहे. पण घडयाळ मात्र जावयाला पाहिजे. त्याला रुसण्याचा अधिकारच आहे असाही एक समज प्रचलित आहे. गंगाला रुसता येत नाही. कारण परंपरेनेच

स्त्री म्हणून कमीपणा तिला दिलेला आहे. हे पुरुषप्रधान संस्कृतीचे चढेलपण आहे. स्त्री ही दुय्यमच रहाते. ती यात कोठेही हस्तक्षेप करु शकत नाही. "इकडच्या लोकांचा तर पाय वरच आहे."[१३] हे गंगाने मनोमन जाणले आहे.

ठरल्याप्रमाणे जावई ऐनवेळेस घड्याळासाठी रुसतो. तणाव वाढतो. गावातली भली मंडळी तरीही आग्रह करुन जावयाला असेल तो आहेर स्वीकारायला भाग पाडतात. जावयालाही समाजाच्या शब्दाला किंमत देणे भाग असते. प्रसंग कितीही टोकाचा असला तरी गावाच्या पुढे जाणे कदापी शक्य नसते. खरे तर तात्याने या प्रसंगी गप्प रहाणे त्यांच्याच सोईचे होते. पण त्यांनाही रहावत नाही आणि ते गंगाला बोलून जातात की,[१४] "घड्याळ बांधून कुठं काय हाफीसला जानार हाय म्हणावं का ?" त्यांच्या मनातला राग इथे प्रकट होतो. चारचौघात ते आणखी बोलतात की, "तुमी मोप हात्ती सांगसाल ओ आनण्याला, पर हितं जमलं पायजी की." [५] इथल्या तणावाचे स्वरुप अनेक पदरी होत जाते.

गंगारामच्या वडिलांनाही झाल्याप्रकाराचा राग येतो. व्याही-व्याही एकमेकांना सुनावतात. वातावरण अधिकच तणावपूर्ण होते. प्रत्यक्ष जावईच त्यांना सुनावतो, "मग आलाच होता कशाला ? आम्ही काही निमंत्रण धाडलेले नव्हते. तात्या आपलीच चूक झाली, आपण यायलाच नको होते"हे ही जाहीर करुन टाकतात. शेवटी राग निघतो गंगावरच. संबंध ताणले जातात. रुढींच्या दडपणाने नाजूक नात्यालाही पीळ पडत जातो.

शेवटी भावाभावातील संघर्ष तर कळसच गाठतो. केवळ आपला अपमान व्हावा यासाठीच आपल्याला पाठविले होते असा तात्याचा

गैरसमज होतो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपण घडयाळ नेले नाही म्हणूनच ते रागावले असतील असे गंगाच्या वडिलांना वाटते. म्हणजे जावयाचे टाकून बोलणे त्यांना नैसर्गिकच वाटते. त्यात गैर काहीच नाही. मागणे हा त्यांचा हक्कच आहे. चूक आपलीच आहे. आपण बोलणे सोसलेच पाहिजे असे गंगाच्या वडिलांना वाटते. परंपरेने चालत आलेल्या गोष्टींचा स्वीकार करणारे हे प्रातिनिधिक पात्र वाटते. ते म्हणतात, "जावयाची कद करायचं न्हवं गोपाळा, आरं केस गुंतलेले हायीत न्हवं का आपले ?"६ या ठिकाणी त्यांच्यातला "बाप" बोलतो.

भावांच्या मध्येही जे सूक्ष्म अंतर पडते आहे ते बोराडे यांनी सहजपणाने दाखविले आहे. म्हणजे कुचंबणा फक्त स्त्रियांचीच होते असे नव्हे तर पुरुषही असहाय असतात. परिस्थिती त्यांनाही अगतिक करते. शरण यायला भाग पाडते.

केवळ जावयाचे एक घडयाळ चुलता-पुतणी, चुलतसासरा-जावई, भाऊ-भाऊ, व्याही-व्याही, थोडया अंशाने पती-पत्नी या नात्यांमध्ये तणाव निर्माण करु शकते. याचीही बीजे या ग्रामरहाटीमध्येच आहेत. एकत्र कुटुंब पध्दतीत हे घडत रहाते. घरातील प्रत्येकाची पायरी ठरलेली असल्याने कुठेही विरोध करता येत नाही. आणि तोडून बोलताही येत नाही. जातीय उतरंड घरातही तयार झालेली असते. त्यामुळे तणावाचे प्रसंग मधून मधून निर्माण होत रहातात.

रा.रं. बोराडे यांनी "नातीगोती" या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "व्यक्तीच्या जन्माबरोबरच त्याची नाती जन्म घेतात आणि त्याची इच्छा असो वा नसो त्याच्या वयाबरोबरच ती वाढत

जातात. ही नाती त्याला जोपासावी लागतात. नात्याच्या या बंधनात त्याला गुरफटून बसावं लागतं. काही वेळेला तर नात्याच्या या बंधनात त्याला असं काही गुरफटून बसावं लागतं की, त्यामुळं त्याला वैयक्तिक सुखाला पारखं व्हावं लागतं. अशा वेळी व्यक्ती म्हणून त्याला अस्तित्वच उरत नाही. दुस-यासाठी जगणं एवढंच त्याच्या नशिबी येतं आणि तोही निमूटपणे हे नशीब जगत असतो. काही वेळेला नात्याची ही बंधनं त्याला आपल्याकडं ओढीत असतात तर दुसरीकडे वैयक्तिक सुखं त्याला आपल्याकडं खेचत असतात. अशा वेळी त्याच्या मनाची अतिशय ओढाताण होत असते. शेवटी वैयक्तिक सुखाला त्याला दूर सारावं लागतं व नात्याच्या बंधनांना सामोरं जावं लागतं. आपल्या इच्छा आकांक्षा आपल्याच पायाखाली तुडवाव्या लागतात. या इच्छा आकांक्षांची त्याला मळणी करावी लागते. [5] बोराडेंचे वरील विवेचन त्यांच्या कथांना अधिकच पुष्टी देणारे वाटते.

जावयाला जर पैसे सासुरवाडीहून हवे असतील तर त्यासाठी बायकोचाच उपयोग केला जातो. तिला मारहाण करणे, त्रास देणे, अचानक माहेरी नेऊन सोडणे असे प्रकार घडत असतात. लेकीला घेऊन अचानक जावई आल्यावर सासरे-सासू-मेहुणे यांची विचित्र अवस्था होते. त्यातूनच तणावाला सुरुवात होते. "रुसवा" या कथेत याच प्रकारच्या तणावाचे चित्र दिसते.

काहीही सणवार नसताना अचानकपणे सावित्री (मुलगी) तिच्या नव-यासह (माधवराव) वडिलांच्या घरी येते. जावयाचे पूर्वसूचना न देता येणे हणमंतरावांना धक्कादायक वाटते. सावित्रीची आई सारजाबाई ओळखतात की, इतक्या अचानक ह्या दोघांच्या

येण्याचा हेतू कदाचित पैसे मागणे हा ही असू शकेल. ती हणमंतरावांना बोलूनही दाखविते की, "म्हागं दोन-तीनदा हातउसने पैसे द्या म्हनून कागद धाडला न्हवता का, पर आपुन काई दिले न्हवते, पर आता समक्षाच मागावे म्हणून आला आसंल."[8] जावयाला केव्हाप्रसंगी पैसे हातउसने देण्याची रीत ग्रामीण समाजातही आहे.

जावयाला सास-याकडून पैसे तर हवेतच. पण ते प्रत्यक्ष कसे मागायचे म्हणून तो साशंकितसा येतो. तिच्या तोंडून आपली गरज वदवितो आणि जर पैसे दिले नाहीत तर मुलीला नांदवायला नेत नाही असा दमही देऊन ठेवतो. इथून ख-या तणावाला सुरुवात होते. पैशा-साठी बायकोला तो वेठीला धरतो. म्हणजे स्त्रियांचा उपयोग प्रतिष्ठे-साठी, पैशासाठी केला जातो. हणमंतरावांची अवस्था मोठी विचित्र होते. पैसे न द्यावे तर लेकीच्या जीवनाशी खेळल्यासारखे होते. पैसे द्यावेत तर चार-पाचशे रुपयांवर पाणी सोडावे लागणार. यात महत्त्वाची गोष्ट अशी की खुद्द मुलगी नव-याला पैसे देण्याच्या विरोधात आहे. मुलीला हणमंतराव विचारतात की, काही बांधकाम, बैलखरेदी यासाठी पैसे हवे आहेत का ? हणमंतरावांच्या मनाचा चांगुल-पणा हा की जर शेतीसाठी काही पैसे खरोखरच हवे असतील तर ते दिले पाहिजेत. याची जाणीव त्यांना आहे. अडचणी सगळ्यांनाच येतात. प्रसंगी आपण एकमेकांच्या उपयोगी पडले पाहिजे. ग्रामजीवनात हा सहकार्याचा विचार नेहमीच राबविला जातो. एकमेकांविषयी भावंडपणा सांभाळला जातो. हे ही परंपरेनेच शिकविले आहे. शेतीच्या संदर्भातल्या अडचणींसाठी तर आवर्जून सहकार्य केले जाते. पण आपण जे पैसे देणार

आहोत त्याचा वापर केवळ चैनीसाठी होणार असेल तर फेरविचार केला पाहिजे असे हणमंतरावांना वाटते. हे साहजिकही आहे. आई सारजाबाई म्हणतात की, "तुज्याकडं बगून तरी निदान आम्हाला पयसे द्यावे लागतेल की."[९] यावर सावित्रीची प्रतिक्रिया फार तीव्र आहे. ती म्हणाते "जाव द्या गेले तर, पर एक पयसा दिऊ नका त्यानला. एकदा का तुमी अस्यानं देतावं म्हणून त्यानला कळलं तर ते सोकावून बसतेलं. दर वारीला ते मला आसं आनतेल आनू पैसे घाल तवा न्हेतो म्हनतेल."[१०] तिला हे माहीत आहे की हे पैसे असेच उडविले जातील. आई वडिलांची पंचाईत होते. मुलीच्या सुखासाठी निर्णय घेणे त्यांना भाग आहे. त्यांच्या मनावर खूप दडपण येत रहाते.

जावयाचे नाते नाजूकच. रिवाजाप्रमाणे त्याला खूष ठेवणे भाग आहे. निर्णय एकट्या वडिलांनाही घेता येत नाही. मुलगा रानबा हा कर्तासवरता आहे. तोच घराचा कारभारी आहे. कुटुंबाला तो महत्त्वाचा घटक आहे. त्याचाही जावयाला पैसे द्यायला विरोध आहे. आता संघर्षाचे केंद्र बदलते. बाप व मुलगा यांच्यात तणाव निर्माण होतो.

दुस-या दिवशी जावयासमोर हणमंतराव रानबाजवळ पैसे देण्याचा विषय काढतात. रानबालाही राग अनावर होणे साहजिक आहे. त्याच्या हक्कावर आक्रमण झाल्याचा भास त्याला होतो. खूप ताणल्यावर हणमंतराव निकराने विचारतात, "माजा एक्दाबी हाक न्हाई हया घरात ११" हा हक्काचा प्रश्न जिव्हारी लागणारा आहे. त्यांच्या असहायतेची ही बोलकी खूण आहे. जावयादेखत आपला मुलगा आपल्याला दुरुत्तर करतो हे त्यांच्या स्वाभिमानाला धक्का देणारेच आहे. ग्रामीण कुटुंबरचनेत जे संकेत पाळले जातात त्याचे हे उल्लंघनच होते आहे.

ह्या भांडणात तात्याबा जाधव मध्यस्थी करतात. गावातला पाहुणा हा प्रत्येकाचाच पाहुणा असतो. गाव हे कुटुंबच असल्याने जाधवांचा हस्तक्षेप खपवून घेतला जातो. बोराडेंची ग्रामीण संवेदनशीलता कशी अस्सल आहे याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. "रुसवा" कथेत तात्याबा जाधव ह्याच व्यापक भूमिकेवरून हस्तक्षेप करतो व तोडगाही काढतो. तात्याबा सांगतात, "मी तुमची नड भागवितो पण घरात इतुष्ट आणू नका."[१२]

तात्याबासारखा बाहेरचा माणूस सासरे व जावई यांच्या नात्यात तणाव निर्माण होऊ नयेत. वडील व मुलगा यांच्याच बेबनाव होऊ नये म्हणून प्रयत्न करतात. मनापासून या वादात भाग घेतात माझी काडीवरही सत्ता नाही तर मी वाट फुटेल तिकडे निघून जाईन म्हणतात. असा निकराचा घाव घातल्यावर तात्याबासारख्याला वाईट वाटणे साहजिक आहे. सगळ्यांनी एकविचाराने रहावे हीच त्यांची भूमिका आहे. कुठल्या घरात तंटे, वितुष्ट असू नयेत. त्यामुळे सगळ्या गावाला वाईट वाटते. गर्दी त्यामुळेच जमते. ती केवळ बघ्यांची नसते. हे ध्यानात घेण्यासारखे आहे. हा प्रश्न प्रत्येकाला आपलाच, आपल्याच घरातला वाटतो. इतक्या जिव्हाळ्याने या प्रश्नाकडे पाहिले जाते. चांगुलपणाची ग्रामजीवनातील ही सामूहिक जाणीव बोराडयांनी फार नेमकेपणाने चित्रित केलेली आहे.

कोणत्याही परिस्थितीत नात्यातले संबंध ताणले जाऊ नयेत हीच हणमंतराव-सारजाबाई, तात्याबा जाधव यांची इच्छा आहे. ही नाती जपली पाहिजेत. ती जगली पाहिजेत असा अंगभूत अट्टाहासही याच्यामागे सुप्तपणे वावरताना दिसतो.

सासरा-जावई, मुलगी-आई, मुलगी-वडील, बहीण-भाऊ, मेहुणा-जावई, पती-पत्नी, या सर्व नात्यांच्या संघर्षाचे तणावाचे हे चित्र ग्रामीण कुटुंबातील वास्तवाचे फार चांगले भान ठेवते.

ग्रामीण समाजामध्ये लग्नाच्या बाबतीत काही रिवाज फार कडकपणे पाळले जातात. मुलाला मुलगी दाखविण्याच्या अगोदर मुलाचे वडील जात असत. मुलगी पसंत करीत असत व तीच मुलाचीही पसंती आहे असे समजून लग्नाला मुलाला तयार करीत असत. मुलाला मुलगी लग्नातच पहायला मिळत असे. यातूनही ब-याचदा पेचप्रसंग निर्माण होतो आणि घरात अशांततेला सुरुवात होते. "सिमंता" या कथेमध्ये ह्याच पेचप्रसंगाचे चित्रण केलेले आहे.

लग्नानंतर, आपली बायको काळी आहे म्हणून आपण तिला नांदवणार नाही. तिला तुमच्या घरी घेऊन जा असा निरोप नारायण पाटलांना (सिमंताच्या वडिलांना) मानाजीराव (सिमंताचा नवरा) देतो. मानाजीरावांनी सिमंताला आधी पाहिलेले नव्हते. पुढे हा पेच निर्माण होतो. मुलगा व बाप यांच्यात संघर्ष सुरु होतो. वडील व्यंकटराव यांनी ही गोष्ट प्रतिष्ठेची मानलेली असते. त्यामुळे आपला शब्द मोडला जातोय म्हटल्यावर त्यांच्या मनाला फार वेदना होतात. ते अस्वस्थ होतात आणि रानात रहायला जातात. यात त्यांचा त्रागाही असतो. मानाजी वडिलांनाही अपमानास्पद बोलतात. पण सासरा नारायण पाटील जिद्दीचा असल्याने तो जावयाला सुनावतो, "संसार करायचा तर त्यो माज्या लेकीसंगच करावा लागंल. न्हाई तर तिच्यावानीच तुमालाबी सारी उमर जाळीत बसावं लागंल. घरदार चालवायचा वखत आला तर

घालवीन, पर तुमाला असा फटाळ्याच ठिवीन. शरथ हाय ही माजी".[१३] इथे त्यांचा अहंकार दुखावला जातो. मुलीच्या वडिलांना मुलीने आयुष्य-भर माहेरीच राहणे कदापीही पटणारे नाही. शिवाय ही गोष्ट अप्रति-ष्ठेची मानली जाते. इथला संघर्ष सासरा-जावई यांच्यातला आहे पण पेच आहे तो सिमंताला. नरहर कुरुंदकरांनी बोराडेंच्या कथेचे विवेचन केलेले आहे. ते इथे रास्त वाटते. ते म्हणतात, "ग्रामीण जीवनात छोटा शेतकरी अगर शेतमजूर असणारा मराठा याला एक विशेष स्थान आहे. आर्थिकदृष्टया अतिशय दरिद्री पण सांस्कृतिकदृष्टया स्वत:ला मातब्बर मानणारा आणि मानापमानांच्या कल्पनांबाबत अतिशय हळवा असणारा असा हा वर्ग आहे. मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचा हा जणू कणाच आहे. असे म्हटले पाहिजे. या समाजाच्या बारीकसारीक सुखदु:खाचे खास त्यांच्या बोलभाषेने जिवंत होणारे चित्रण हा बोराडेंच्या कथेचा मुख्य गाभा आहे."[१४]

सिमंताच्या वडिलांनीही हा प्रश्न प्रतिष्ठेचा केला. तसा मानाजीरावांच्या वडिलांनाही ही गोष्ट अपमानकारक वाटते. शेवटी सिमंता बापाबरोबर माहेरी जायला निघते. जाताना ती नवऱ्याच्या पाया पडते. हे फार अर्थपूर्ण आहे. तिच्या संस्कारशील, घरंदाज-पणाचे हे प्रतीक आहे. जरी नवरा आपल्याला काळी असल्यामुळे नांदवायला तयार नसला तरी, तसे तो स्पष्ट बोलून दाखवीत असला तरी तिने तिचे सर्वस्व त्याच्याशीच बांधलेले आहे. म्हणून या निकराच्या प्रसंगीही ती आपले संस्कार विसरत नाही. तिच्यासाठी जणू हे चाललेलेच नाही याच आवेगात ती वागते.

हताशपणे व्यंकटराव उद्गारतात, "आमचं बाप लेकाचं नातं तर कवाच तुटलं होतं. मरयादा सोडली तवाच आमचं बापलेकाचं नातं संपलं व्हतं."[१५] मुलगा आणि बाप यांच्यातील नात्यात अशारीतीने तणाव निर्माण होतो याही पेक्षा अधिक तणाव पती-पत्नी या नात्यावर येतो. नव-याच्या झोपायच्या खोलीत सिमंता त्याच्या पायाजवळ बसते. तेव्हा मानाजीराव सुनावतात, "खबरदार माज्या अंगाला हात लावशील तर. आजपासून तुजा माजा काई संबंध न्हाई. आता तू माझी बायकु म्हणून नांदत न्हाईस. ह्या वाडयात सास-याची सून म्हणून नांदतीस. हितं माज्या खोलीत तुला झोपायचं झालं तरी येगळं झोपलं पायजी. माज्याजवळ आलीस, माज्या अंगाला हात लावलास तर तुज्या मायची शप्पत हाय तुला."[१६] तिची काहीही चूक नसताना हा अन्याय तिला सोसावा लागतो. दोघांचीही मानसिक दृष्टया कुचंबणा होते आहे. एकाला अहंकार अधिक तर दुस-याचा सोशिकपणा कमालीचा आहे. बाहेर व्याही-व्याही रंगात येऊन गप्पा मारतात. त्यांच्यादृष्टीने हा तणाव संपलेलाच आहे. पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे.

सासरा-जावई, व्याही-व्याही, पती-पत्नी, यांच्यातील ही नाती ह्या तणावाच्या भोव-यात गरगरतात. कुठे व्याह्या-व्याह्यातील तणाव संपून स्थिरावतात तर कुठे पती-पत्नीतील तणाव अस्थिरच रहातात.

मानापमानाच्या या कल्पना कधी कधी फारच भयानक रुप धारण करतात. त्यामुळे मुला-मुलींची भावनिक कुचंबणा होते. त्यांचे वैवाहिक

आयुष्य विस्कटते. पण या मान-अपमानाच्या कल्पना सुद्धा शाबूत नाहीत की शिथिलही होत नाहीत.

"बांध" कथेमध्ये विश्वनाथ आणि चंद्रभागा यांचा विवाह होतो. गावातच सासर व गावातच माहेर अशी चंद्रभागाची अवस्था असते. विवाहानंतर काही दिवसातच व्याहयाव्याहयांची भांडणे होतात. एकमेकांविषयी गैरसमज होतात आणि सासरा तावातावाने मुलीला तिच्या माहेरी सोडून येतो. मुलगा विश्वनाथ गप्प बसतो. कारण वडिलांचा निर्णय ओलांडणे त्याला शक्य नसते.

अचानक एके दिवशी रानात त्यांची भेट होते. तेव्हा दोघांच्याही मनाची विलक्षण ओढाताण होते. दोघेही एकाच गावात रहातात. एकाच बांधावर उभी आहेत. मनानेही एक आहेत पण एकमेकांना भेटू शकत नाहीत. बोलतात तीही दबकेपणाने. त्यात मनावरचे दडपण स्पष्ट दिसत असते. याच्या मुळाशी मानापमानाच्या कल्पनाच आहेत. एकाच गावात दोघे रहात असूनही दोघांच्याही घरच्या लोकांची त्यांच्यावर करडी नजर आहे. दोघे एकमेकांना भेटू नयेत यासाठी ही योजना केलेली आहे.

चंद्रभागाला विश्वनाथशी बोलायचे आहे. त्याच्या अल्पसहवासाने ती सुखावतेही. पण वास्तवाचे भान येताच ती सावध होते. दोघेही कामात लक्ष लागत नसल्याची तक्रार करतात. हे मानवनिर्मित दुःख आहे. दोन व्याहयांनी आपापल्या प्रतिष्ठेच्या कल्पनांपुढे या दोघांच्या भावनिक विश्वाचा विचारच केलेला नाही. नात्यापेक्षाही प्रतिष्ठा मोठी ठरते. हिंदुसमाज पितृसत्ताक

असल्यामुळे वराची बाजू ही नेहमी श्रेष्ठच मानली जाते. हे केवळ मराठा समाजातच आहे असे नव्हे. ही परिस्थितीजन्य दु:खे विश्वनाथ आणि चंद्रभागा या दोघांनाही अस्वस्थ करतात.

चंद्रभागा म्हणते, "भोगवटा हाय तो काय चुकत असतो का ? " त्यावर चिडून विश्वनाथ विचारतो, "आसला कसला भोगवटा हाय तरी म्हनावं ? एका गावात असून आसं परक्यावानी वागायचं आलं !" १७ ग्रामीण मनावर दैववादाचे संस्कार झालेले असतात. त्यामुळे जे काही घडते त्याला आपले नशीबच कारणीभूत आहे अशी पक्की समजून झालेली असते. हे असे का ? म्हणून विचारण्यापेक्षाही हे भोगलेच पाहिजे हा उपजत शहाणपणा परिस्थितीनेच यांना शिकविला आहे. भांडणात नवरा वडिलांना घाबरतो. याची आठवण ती करून देते, तेव्हा त्याचे उद्गार त्याच्यावरील संस्काराची प्रचिती आणून देतात तो म्हणतो, "वडीलच हायीत ते. त्यान्ला न्हाई घाबरायचं तर कुणाला घाबरायचं ? १८ वडिलकीला मान देणे हा ग्रामीजीवनातला एक अटळ संस्कार आहे. प्रसंग कुठलाही असो. वडिलांचा शब्द मोडला येत नाही.

निदान एक रात्र तरी तिने रहावे यासाठी विश्वनाथ खूप विनवणी करतो. तिलाही हे नको असते असे नाही. पण तर्कटी वडील आणि रागीट सासरे यांच्या दबावाने ती घाबरते. उगीच यातून आणखी नवे संकट उभे राहील व तणावाला वेगळीच दिशा मिळेल. म्हणून ती सावध आहे. ती नव-याला म्हणते, "त्या बाबाच्या मनातलं काय सांगता येतंय, उगं माझ्या पदरात फळ बांधून

बसेल."[१९] हा नकार केवळ भीतीपोटीच ती देत आहे. विश्वनाथजवळ नाराज होण्यापेक्षा दुसरे काही नाही. त्यामुळे त्याची उदासी अपरिहार्य आहे. बायको हक्काची असताना त्यानं थोडी जबरदस्ती केली असती तर ती अनैसर्गिक वाटली नसती. पण तोही कोमटपणे नुसते पहात बसतो. निदान एकांतात तरी त्याने धाडस दाखवावे असे वाटते. पण त्याच्या मनावर परिस्थितीचा, नात्याचा इतका प्रचंड दबाव आहे की तो काहीही करु शकत नाही.

बोराडे यांचे वैशिष्टय असे की दु:खाच्या सूक्ष्म छटा ते सहजपणाने रंगवतात. त्यातून मनाच्या अनेक अवस्था, प्रकट होतात आणि कथेच्या आशयाला नेमकेपणा प्राप्त होतो. यात रंजकतेपेक्षाही वास्तवाचे भान त्यांना अधिक आहे. बोराडयांच्या कथेविषयी म.द. हातकणंगलेकर सांगतात की, "बोराडयांची कथा तशी स्वस्थ आहे. ग्रामीण जीवनाची संथ गती तिला आहे. रंजकतेचा खोटा सोस ती दाखवीत नाही. या जीवनातल्या नात्यागोत्याचे भावबंध ती चांगली ओळखते व जोपासते. माडगूळकरांच्या कथेप्रमाणे ती शालीन, मितभाषी आहे. त्याप्रमाणेच ती गावाकडच्या गोष्टी सांगते, व माणसांच्या त-हा न्याहाळते. तशी ती प्रामाणिक आहे."[२१] श्री. हातकणंगलेकरांचे हे मत बोराडयांच्या कथेचे नेमकेपण हेरते असेच म्हणावे लागते.

बोराडे यांनी ग्रामीण समाज रचनेतील एकत्रकुटुंबपध्दतीमुळे जी दु:खे निर्माण होतात तीच अनेक अंगानी मांडलेली आहे. कुटुंबात नात्यांचे महत्त्व व त्याची जपणूक ही जिवापाड केली जाते पण ती करताना जी भावनिक हेळसांड होते ती फारच क्लिष्ट असते. एकंदर

सर्वच ग्रामीण परिसरातील जातीरचनेमध्ये जावयाच्या संदर्भात हे घडताना दिसते. परंतु बोराडे यांनी स्वत:च्या या प्रकाराच्या लेखनाची मीमांसा करताना असे म्हटले आहे की, "'मळणी' या माझ्या कथासंग्रहातील कथांतील बहुतेक पात्रं आपल्या भावनांची मळणी करतात. माझ्या इतरही कथांतून बहुधा अशाच परिस्थितीत सापडलेली माणसं आढळतील. ही माणसं साधारणत: खेड्यातील मराठा समाजातील माणसं आहेत. ही मानसन्मानाला अतिशय जपतात. नात्यागोत्याला विलक्षण महत्त्व देतात. या नात्याच्या संदर्भातून त्यांच्यावर पडणारी जबाबदारी ते निमूटपणे पाळतात. नव्हे हा, आपला धर्मच आहे असे ते मानतात आणि याचं पालन करीत असताना वैयक्तिक सुखांना आचवतात."२१ या ठिकाणी केवळ मराठा समाजातच अशा प्रकारच्या मानसन्मानाच्या कल्पना असतात असे मानावयाचे मुळीच कारण नाही. ग्रामरचनेमध्ये सगळयाच जाती-जमातीच्या रीतीरिवाजामध्ये नात्याला जपण्याचे प्रकार दिसतात. बोराडे यांनी ही मर्यादा घालावयास नको होती असे वाटते.

जावयाचे प्रस्थ सगळयाच जातीत असल्याने सगळयांनाच थोडया फार प्रमाणात या दु:खाला सामोरे जावे लागते. कुठल्याही जावयाची करणीची अपेक्षा व तीपूर्ण न झाल्यास बायकोचा छळ हे सर्वांच्याच बाबतीत घडताना दिसते.

## सारांश:

थोडक्यात आपणाला असे म्हणता येईल की, गावापेक्षाही इथे कुटुंब हेच खरे चित्रणक्षेत्र आहे. पितृसत्ताक कुटुंबपध्दतीमुळे जी ताणतणावाची मालिका तयार होते व त्यातून नाती ताणली जातात. कधी कधी तर ती तुटतात की काय अशी भीती वाटावी अशीही परिस्थिती निर्माण होते.

याचेच सूक्ष्म अवलोकन बोराडे यांनी केलेले आहे व त्यालाच कथारूप दिलेले आहे. या कथांमधून बाप-मुलगा, आई-मुलगी, बहिण-भाऊ, सून-सासू, सून-सासरा, नवरा-बायको, व्याही-व्याही, चुलते-पुतणे, दीर-भावजय, यांच्या मनाची घडण कशी असते, प्रसंगी ते कसे रागावतात, भयभीत होतात किंवा सोसतात हे ही समजून येते. दारिद्र्य असले तरीही प्रत्येकजण आपापला अहंकार सांभाळून आहे. आर्थिक स्थितीचा व आत्म-प्रतिष्ठेचा तसा काहीही संबंध इथे लावता येत नाही. काही वेळा दारिद्र्य तर काही वेळा अहंकार त्यांना दु:खात लोटतात. ही मानव-निर्मितच दु:खे असतात. ग्रामीण समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळेच ही दु:खे निर्माण होतात. असे म्हणता येईल. लग्न होणे या घटनेला जेवढे महत्त्व आहे तेवढेच मानपानालाही आहे. या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू मानल्या जातात. दारिद्र्याने तुटेपर्यंत ताणलेले संबंध व अहंकाराने दुरावत जाणारे संबंध असे दोन घटक या समाजरचनेत फार प्रभावी आहेत.

## (अ) स्त्रियांच्या कुचंबलेपणाच्या कथा:

### प्रास्ताविक:

आपल्याकडील पुरुषसत्ताक कुटुंबपध्दतीमुळे स्त्रियांची कुचंबणा होत आली आहे. स्त्री ही कमी दर्जाची आहे या कल्पनेमुळे, परंपरेने लादलेल्या, कधी तिच्या अंगच्या नैसर्गिकदृष्टयाच असलेल्या दुर्बलतेमुळे, तिचे शोषण सतत अनेकांगांनी होत आलेले आहे. कधी आपणच निर्माण केलेली समाजव्यवस्था तिच्या दु:खाला कारणीभूत होते तर कधी परिस्थितीच तिची अशी कोंडी करते की तिला शरण येणे भागच पडते.

स्त्री कष्ट करते. त्याग करते. कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी सर्व काही सोसते. पण आपल्या कष्टाची, त्यागाची वाच्यताही करत नाही. ग्रामीण कुटुंबातील स्त्री ची दु:खे अनेक पदरी आहेत. कुटुंबात ती जबाबदारीने, अनेक नात्यांचे भावबंध जपत वावरत असते. कधी आई,आजी, कधी सून, बायको, नणंद तर कधी भावजय, जाऊ अशा कौटुंबिक नात्यांनी तर कधी मजुरी करणारी. सालाने दुस-याच्या शेतावर राबणारी, कधी कर्त्या पुरुषामागे प्रपंचाचा गाडा नेटाने चालविणारी अशी ही स्त्री आहे. ग्रामीण कुटुंबातील स्त्रीच्या व्यथा रा.रं. बोराडे यांनी आपल्या कथांमधून सहजपणाने टिपल्या आहेत. स्त्रियांचे अनेक प्रकारचे कुचंबलेपण त्यांनी योग्य रीतीने चित्रित केलेले आहे. या प्रकरणामध्ये "स्त्रियांच्या कुचंबलेपणाच्या कथांचा" विचार करावयाचा आहे.

.....

स्त्री मनाच्या मानसिक कुचंबणेचे चित्रण:

ग्रामीण कुटुंबरचनेमध्ये "साटया-लोटयाचं लग्न" हा प्रकार आजही रूढ आहे. ब-याचदा योगायोगाने असे लग्न जमविले जाते. तर काही वेळेला नाईलाजानं अशी नाती जोडावी लागतात. अशा नात्यामध्ये दोन्हीही बाजूने नाजूक अवस्था असते. कधी तरी कुठे तरी एखादा प्रसंग घडून जातो आणि तात्पुरते वादळ या कुटुंबात उभे रहाते. त्यातही स्त्रियांनाच सोसावे लागते.

"नातीगोती" संग्रहातील "धुणं" ही अशाच साटया-लोटयाच्या लग्न संबंधातल्या तणावाची कथा आहे. लेकीच्या भल्यासाठी आपल्या मुलाला सावित्रीबाईची मुलगी केलेली आहे. सावित्रीबाई आपल्या सुनेला फार चांगल्या प्रकारे वागवत असतात. सुनेला जाच करावा तर आपल्या मुलीला तिच्या सासरी त्रास होईल म्हणून दोन्हीकडेही सर्व ठीकच असते. सावित्रीबाईची सून आपल्या सासूबद्दल म्हणते, "नव्या नवरीला आताच रानाचं वारं नकु म्हनत्यात. लईच काळजी घेत्यात आत्याबायी माजी. पोटच्या लेकीवनी जपत्यात मला." हे सांगून लोकांनी सासूविषयी करून दिलेले गैरसमज कसे खोटे आहेत हे सांगताना म्हणते, "लगनाच्या वक्ताला लई भ्या दावलं होतं लोकवांनी मला. साटया-लोटयाचं लगीन हाय न्हवं का माजं. लेक आडात ढकलून द्यावी, पर साटया-लोटयावर दिऊ नी म्हणत्यात."२२ साटया-लोटयाच्या लग्नाविषयी ग्रामीण लोकांच्यातील समज-गैरसमजच ही सून बोलून दाखविते.

क्वचितच सासू-सुनांचे संबंध इतके चांगले असू शकतात. एकदा रानातून गवताचा खूप मोठा बोजा सासूने आणल्याबद्दल सून रागावते.

मान लचकेल म्हणूनही भीती व्यक्त करते. त्यावर सावित्राबाई जे उद्गार काढते ते ग्रामीण कुटुंबरचनेतील स्त्री या घटकाला तंतोतंत लागू पडतात. "लचका कसा बसल ग. भारं आनून आनून पार घटून गेलीय बिचारी."२३ इथे मानच नव्हे तर ही स्त्री ही अशीच झिजते आहे. तिला कसलीही तक्रार करता येत नाही. निमूटपणे ती सर्व सोसते आहे.

सावित्रीबाईच्या मुलीला नदीवर धुणं धुवायला गेल्यावर चोळी हरवली म्हणून सासू मारते. हे कळते. सावित्रीबाईला वाईट वाटते. ती रडतेही. आईच्या मायेला हे अपरिहार्यच आहे. आपली लेक सुरवात असावी असे कुणाही आईला वाटणे अत्यंत साहजिक आहे. वास्तविक आपल्या सुनेला ती फार चांगले जपत असते. यातला उद्देश आपल्या मुलीला त्रास होऊ नये हा असला तरी सावित्रीबाई सुनेवर प्रेम करीत असते. हे नाकारून चालत नाही. पण आपल्या मुलीला एखाद्याश्या कारणावरून मारले म्हटल्यावर तिच्यातली "सासू" जागी होते. सासूचा परंपरागत कजागपणा आपोआपच येतो. याच रागाच्या भरात ती सुनेच्या थोबाडीत मारते व म्हणते, "उठ की ये व्हयमाले. राज्याच्या रानीवानी आकडा टाकून काय बसलीस ? ते धुनं काय तुजी माय येनाराय का धुवायला ? "२४ पण हे क्षणभरच.

दुसऱ्याच क्षणी तू उन्हात नदीवर धुवायला जाऊ नको असंही ती बजावते. दरडावून सांगते. तू आजारी पडशील म्हणून काळजीही करते. याक्षणी ती "नॉर्मल" होते. तिच्यातला "सासूपणा" विरघळून जातो. व मूलत:च जो तिच्याठायी चांगुलपणा आहे तो ही तिला चांगलेच वागायला भाग पाडतो. असे अजूनही एक सासू चोळी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR.
SH ★ KOLHAPUR

हरकिती तर सुनेला मारते. तिला नदीवर धुवायलाही पाठविते. तर दुसरी सासू उनात तू जाऊ नको, आजारी पडशील असे बजावते.

स्त्रियांमधीलच दोन वेगवेगळया प्रवृत्ती बोराडे यांनी दाखविल्या आहेत. इथे कुचंबणा स्त्रीची होते पण तीही दुस-या स्त्रीकडूनच. निवेदन करणारी सून तर कात्रीतच सापडते. तिच्या मनावर ताण येतो तो माहेरच्या लोकांनी असे वागायला नको होते याचाच.

माहेरच्या दारिद्र्यामुळे होणारी कुचंबणा:

परिस्थितीच्या रेटयामुळेही कधी कधी माणसे हतबल होतात. त्यांच्या इच्छा आकांक्षांना आवर घालण्याची पाळी त्यांच्यावर येते. त्यात दुष्काळासारखे सार्वजनिक संकट जर उभे राहिले तर सगळयांनाच त्याची झळ पोहोचते. ब-यापैकी जीवन जगणारा शेतकरीही हवालदिल होतो. अनेक वर्षे पाळलेल्या परंपरा व सांभाळलेले रिवाजही सांभाळणे कठीण होऊन बसते. "माहेर" कथेतील विठ्ठलराव आणि त्यांची मुलगी सुमित्रा अशाच पेचात सापडलेले आहे. पुरुषांना स्त्रीने अधिकार दिले पण स्त्री सदैव त्या अधिकाराखाली दबत राहिली.

दुष्काळाचे संकट मानवनिर्मित नाही. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असणारी शेती ब-याचदा नुकसानीतच असते. खेडयातील मुख्य व्यवसाय शेतीच असल्याने शेतीवर आलेले संकट हे तिथल्या माणसांच्या जीवावरचे संकट असते. अशा दुष्काळात विठ्ठलरावासारखा शेतकरी अगतिक होऊन जातो. दुष्काळाने आर्थिक तंगी निर्माण केली. धा-याची तीव्र टंचाई निर्माण झाली. त्याचा परिणाम नात्यागोत्यावरही

होऊ लागला. या स्थितीने त्यांना त्यांची पायरी दाखवून दिली. अशातच लेकीला दिवाळसणासाठी माहेरी आणावयाचे आहे. गेल्या चार-पाच वर्षांत त्यांनी हे कटाक्षाने पाळले आहे. पण या वर्षी हे जमेल की नाही अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. हुलग्या, उडदावर दिवस काढण्याची पाळी आली आहे. अशात लेकीला आणले तर तिचेही आपल्याबरोबरच हाल होणार म्हणून बापाला वाटते की या वर्षी मुलीला आणू नये. पण मुलीच्या आईची माया तिला गप्प बसू देत नाही. ती नवऱ्याला सांगते, की आपली परिस्थिती तिला सांगा. व यातूनही जर ती येणार असेल तर येऊ द्या. इथे दोन गोष्टी आहेत. एकतर मुलीची आई शोकी स्त्रीच आहे. तिलाही कुटुंबाची अप्रतिष्ठा होऊ द्यायची नाही. मुलीला सुख लागावे ही यातली दुसरी बाजू आहे.

व्याही किसनराव मात्र बोलण्यातल्या चतुराईने त्यांच्या परिस्थितीची त्यांना जाणीव करून देतो. त्यात आपण कसे वरचढ आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करतो. वास्तविक दोघांच्याही आर्थिक स्थितीत तसा फारसा फरक नसतो. पण आता व्याही आपणाहून बोलण्यात सापडलाच आहे म्हटल्यावर आपली मुलाकडची बाजू वरचढ कशी आहे हे दाखविण्याची संधी आली आहे. ती सोडायला ते तयार नाहीत. सुमित्रेला हे पटत नाही. ती अस्वस्थ होते. वडिलांचा भोळसटपणा व सासऱ्याची चतुराई तिला ओळखू येते. सासऱ्याने अशा पध्दतीने आपल्या वडिलांची उलटतपासणी घ्यावी हे तिला खपत नाही. अशा वेळी ती सासऱ्याला जाब विचारायलाही मागे पुढे पहात नाही. त्यांच्याकडे तारांबळ आहे म्हणून मी विचारत होतो अशी हिकमतीची उत्तरे सासरा करतो, त्याला सुमित्रा विचारते, "हे सारं तुमाला ठावच

व्हतं, तर मग इचारीत कस्याला बसलाव ? धाडायचं न्हाई म्हनून सपष्ट सांगायला येत न्हवतं का ? "२५ बोराडयांच्या कथेत पहिल्यांदाच स्त्री बोलते आहे. सासरा असला तरी त्यानेही त्याच्या काही मर्यादा पाळल्या पाहिजेत याची जाण असणारी सुमित्रा आहे. अप्रतिष्ठा मग ती वडिलांची की सास-याची, कुणाचीच होऊ नये हा चांगला विचार त्याच्यामागे आहे. सुमित्रा माहेरी जाण्याचा बेतही रद्द करते. "लेकीच्या जातीला कवा तरी नगं वाटंल का म्हायेराला जायला ?" असं विचारणारी सुमित्रा आपले जाणेच रद्द करते. तिला हा निर्णय नाइलाजाने घ्यावा लागतो. मनातून तिलाही माहेरला जायचेच होते.

ग्रामीण जीवनातील स्त्रियांची असहायता इथे व्यक्त होते. बापाची अवहेलना करुन घेणे तिला पसंत नाही. माहेर प्रिय आहेच पण सासरही अप्रिय नाही. सुमित्रेला दुहेरी पेच इथे आहे. बाप मुलीशिवाय घरी जाणार मुलीला माहेरची ओढ आहे तरीही जाता येत नाही. अखेर स्त्री ही असहायच आहे याचे प्रत्यंतर ही कथा आणून देते.

मूल न झाल्याने होणारी कुचंबणा:

बोराडे यांनी स्त्री दु:खाच्या विविध त-हा फार सूक्ष्मपणे टिपल्या आहेत. "लग्न" या एकाच केंद्राभोवती दु:खाची अनेक आवर्तने कशी उमटत जातात हे ही बोराडे न्याहाळतात. लग्नानंतरही अनेक समस्यांना स्त्री सामोरी जाते. खेडयामध्ये मूल होणे हया गोष्टीला फार महत्त्व असते. नरहर कुरुंदकरांनी "वानवळा"च्या प्रस्तावनेत या संदर्भात विवेचन केलेले आहे, "ज्या जीवनाचे चित्रण बोराडे करीत आहेत त्या जीवनाचा कुटुंब हा एक

महत्त्वाचा भाग आहे. ग्रामीण जीवनात ही कुटुंबाची जाणीव फारच बलवान असते. कुटुंबाच्या आधारे माणूस समर्थ होतो आणि या कुटुंबाच्या समोरच तो अगतिक होऊन जातो. या कुटुंबविषयक जाणिवेत मुलाला फार मोठे महत्त्व आहे. लग्न झाल्याबरोबर जर मूल लवकर झाले नाही तर बाईच हवालदिल होते असे नाही तर पुरुषही केविलवाणा होतो."२६

"नातं" कथेमध्ये अशाच हवालदिल झालेल्या शेवंताची व्यथा बोराडे मांडतात. लग्नानंतर बारा वर्षे झाली तरी तिला मूल झाले नाही. अजूनही आपणाला मूल होईल या आशेवर ती जगते आहे. रामराव हा दुसरे लग्न करण्याच्या विचारात आहे. मातृत्व ही स्त्रीत्वाची सगळयाच फलदायी बाजू मानली जाते. मातृत्वाशिवाय स्त्रीत्व अपुरे आहे अशी समजूत आजही ग्रामीण समाजात रूढ आहे. शेवंताने नव-याला दुस-या लग्नाची परवानगीही दिलेली आहे. आपण दु:खी आहोतच निदान नव-याला तरी मुलाचे सुख मिळावे ही भावना यात आहे. मुलीच्या आई बापानाही मुलीच्या भवितव्याची चिंता आहे.

अशात मुलीचे वडील तात्याबा पत्नीच्या विचाराने त्यांची पमा नावाची मुलगी रामरावांना देण्याचा घाट घालतात. ग्रामीण कुटुंब-रचनेत बहिण सवत होऊन आल्याची अनेक उदाहरणे दिसतात. लोक काय म्हणतील ? याची मुलीच्या आईबापाला सतत भीती वाटत असते. "पर लोक म्हनतेल की सवतीवर दिलं म्हनून."२७ यात लोक म्हणतील तेव्हा हुंडा आपण देऊ हा ही तोडगा काढला जातो. हे लग्न चार लोकांच्या संमतीने व साक्षीने व्हावे. असेच आईबापांना वाटते. "समाज" हा घटक इथे फार महत्त्वाचा आहे. मुलीच्या आईवडिलांना वाटले, नव-यालाही

मुलगी पसंत पडली तर लगेच लग्न होत नाही. जरी हे दुसरेपणाचे लग्न असले तरीही त्याला समाजमान्यता ही हवीच आहे.

शेवंताची कुचंबणा अशी की तिला बहिणीनेच सवत म्हणून यावे हे मान्य नाही. वडिलांचा मानस कळण्यापूर्वी पमाच्या लग्नाविषयी ती म्हणते, "आमदा मातर ठिवू नका तिचं. न्हाई तर लोक म्हणतेल एव्हडी मोठी नवरी हुईस्तवर लगीन केलं न्हाई. तवा काई तरी बद्दा दिसतोय."२८ लोकसमजूत कशी दबाव आणते ते पहायला मिळते. वडिलांचा प्रस्ताव शेवंताना मान्य नाही. ती नव-याच्या परस्परच बापाला समजावून सांगते. पमाचा आग्रही स्वभाव आमच्यात भांडणे निर्माण करील या शब्दात ती बापाला सुनावते. याही पेक्षा तिला चांगल्या घरी [illegible] द्या. त्यासाठी हवे तर हजार-दोन हजार रुपये मदत करायलाही मी तयार आहे. पण तिला या घरात माझी सवत म्हणून आणू नका. यात व्यवहारही आहे आणि दूरदृष्टीही आहे. माहेरचे संबंध चांगले रहावेत आणि नव-यालाही सुख मिळावे अशी तिची भावना आहे. उगीच भांडणातच आयुष्य जायला नको. आधीच मूल नसल्याचे दुःख तिला आहेच त्यात आणखी भर नको म्हणून ती पमाला विरोध करते. तिचा हा विरोध संयुक्तिकही वाटतो. ती बापाला म्हणते, "म्हयना चार म्हइन्याचा संबंध असता तर म्या कंवी सोसलं असतं. पर ह्यो जल्माचा संबंध हाय."२९ बापाला नाराज करणे तिच्या जीवावर येते पण ती निश्चयी आहे. तिच्या निर्णयापासून ती ढळत नाही. बापाने जरी यातच तुझे खरे हित आहे असे सांगितले तरीही ती अजिबात निर्णयापासून दूर होत नाही. चंद्रकांत बांदिवडेकरांनी बोराडे यांच्या कथेविषयी म्हटले आहे की, "बोराडेयांच्या कथेत ठोकर

खाणाऱ्या, सरपटत जीवन जगणाऱ्या व दु:खाचे ओझे वाहणाऱ्या ग्रामीण जनतेच्या यातना सामान्य घटनांतून व प्रसंगातून व्यक्त होतात."३०

मूल होणे या गोष्टीला ग्रामीण समाजात फार महत्त्व आहे. वंशवेल वाढावी यासाठी बहुपत्नीत्वाचाही स्वीकार केलेली काही मंडळी पहावयास मिळतात. इस्टेटीला वारस, नाव चालविण्यासाठी वारस, प्रतिष्ठेसाठी वारस अशा कल्पना निर्माण होतात. या बाबतीत तडजोडीलाही कुठे वाव नसतो. दुर्दैवाने मूल न झालेली एखादी स्त्री मुलासाठी नको ते दिव्य करायला तयार होते. पण समाज, कुटुंब यांचा धाक तिला लवकरच सावध करतो आणि तिचा विचार बदलतो. "झुंबरठा" कथेमध्ये कृष्णाबाई मुलासाठी आसुसल्या आहेत. पोटच्या मुलीसारखा सांभाळणारा सासरा, आणि पाक्लोपाकी जपणारा नवरा तिला मिळालेला आहे. मोठा वाडा, शेती चांगल्यापैकी आहे. फक्त वंशाला दिवा नाही याची खंत तिला रात्रंदिवस जाळत असते. मुलगा नाही याचे दु:ख जाईटच. बाईचे बाईपणाच त्यामुळे अपुरे रहाते अशीही एक समजूत आहे.

अंगाने मजबूत, रंगाने गोरा असणारा दौला गडी कृष्णाबाईला मनापासून आवडतो. तारुण्याच्या कैफामुळे दौला घरचा गडी असूनही त्याला एकांतात खाऊपिऊ घालते. त्याच्यासाठी झुरते. त्याच्यावर जीव लावून प्रेम करते. त्याने दिलेल्या चोळीच्या खणाचा स्वीकार करते. याच खणाने माझी ओटी कधी भरणार अशी विचारणाही करते. मात्र नवऱ्या आणि सासऱ्यासमोर मात्र ती दौलतीला गडयासारखी वागणूक देते. तिला वास्तवतेची जाणीव ही होते. पण एकांतात तोच तिचा सर्वस्व असतो. तिला त्याची अनिवार ओढ लागते. त्याच्यासाठी समाजमनाची

भीती, भावकीचा धाक आणि घर वाळीत टाकण्याची संभाव्य भीतीही तिला वाटत नाही. कारण शरीराच्या सुखापुढे बाकीचे सगळे तिला तुच्छ वाटायला लागते. पण भानावर येताच तिला दौलतीची पायरी समजते. ती त्याला सुनावते, "पुना कवा आसं भलत्यासलत्या येळी येऊ नका वाडयात. म्या कुळाशीळाची बाईल हाय. तुमची पायरी तुमाला ठाव हाय. तुमी तुमच्या पायरीपरमानं वागा. जा आता."[३१]

कृष्णाबाईच्या शरीराला आणि मनालाही तो हवा आहे, पण त्याचा उघड स्वीकार करणे समाज बंधनांनी, रीतीभातींनी शक्य होत नाही. या बाजूनेही कृष्णाबाईची कुचंबणा होते. अपवादाने का होईना पण ग्रामीण स्त्री जगतामध्ये अशा कृष्णाबाई आपले दु:ख सोशीत बसलेल्या दिसतात. सगळीकडून अतृप्तीच त्यांच्या वाटयाला आलेली असते. तु.शं. कुलकर्णी यांनी कृष्णाबाईच्या अवस्थेचे वर्णन करताना म्हटले आहे की, "उंबरठा" ही कृष्णाबाईच्या एकाकी जीवनामधील डोंगराएवढया दु:खाचे चित्रण करणारी कथा आहे."[३२] हे सहज पटून जाते. तिच्या दु:खाची जातच वेगळी आहे. तरीही ती संस्कृतीचा उंबरठा ओलांडीत नाही. तरीही ती ज्या पध्दतीने दौलतीकडे आकर्षित होते त्यात तिच्या मनाची कुतरओढ होणे ही अटळ गोष्ट आहे. एवढे होऊनही ती नव-याबद्दल कुठेही अनादर दाखवीत नाही. उलट वेळोवेळी त्याच्या स्मरणाने ती स्वत:चा तोल सावरताना दिसते.

परंपरा जपणारी ही मने एकाएकी बदलू शकत नाहीत. नरहर कुरुंदकरांनी "वानवळा"च्या प्रस्तावनेत याचे विवेचन करताना सांगितले आहे की, "या परंपरागत मनात नवरा हा नुसता शय्येचा साथीदार

नसतो. त्याहून तो कितीतरी अधिक असतो. म्हणून वासनेचा कोंडमारा कितीही असह्य झाला तरी संस्कृतीच्या हजार बंधनात माणसे कुढतात, तडफडतात. पण हे बंधन त्यांना सहाजासहजी टाळता येत नाही. हा वासनेचा अनेक पदरी, अनेक पातळींवरचा सांस्कृतिक आलेख हे बोराडे यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे."[33]

माहेरच्या माणसांच्या वर्तनाने कुचंबणा:

एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये काही वेळा भावजयीचे वर्चस्व वाढत जाते. त्याचा परिणाम बहिणीच्या हक्काच्या माहेरपणावरही होतो. तिच्या इच्छा मारल्या जातात. वर्षानुवर्षे बहीण माहेरून मुराळी येईल म्हणून वाट पहात रहाते पण तिची निराशाच होते. अशा निराश झालेल्या बहिणीचा बाणेदारपणा "मुराळी" कथेत बोराडे यांनी चितारला आहे. स्त्रीच स्त्रियांच्या दुःखाला कारणीभूत होते. आधीच कुटुंबात तिला मूल्य कमी असते त्यात असली दुःखे वाटयाला आल्यावर तर ती जास्तच असहाय होते.

सगुणाचा भाऊ सुखदेव अचानक सण-वार नसताना तिला माहेरी नेण्यासाठी गाडी घेऊन येतो. तिला आश्चर्य वाटते व आनंदही होतो. थोडयाच वेळात तिच्या लक्षात येते की सुखदेवची बायको, सगुणाची भावी बाळंतपणासाठी दोन तीन महिने माहेरी गेल्याने घरी कुणी तरी बाई-माणूस भाकरी थापण्यासाठी हवे हा केवळ व्यावहारिक दृष्टिकोण डोळयासमोर ठेऊन भाऊ आपल्याला न्यायला आला आहे. हे समजताच ती माहेरी जायचे नाकारते. इथे नव-याची तारांबळ होईल म्हणून मला येणे जमत नाही असे कारण सगुणा सांगते. तिला जायचेच नसते त्यामुळे

एवढे कारण पुरेसे होते. यावर भावाचा आरोप असा की, "तू काय बी म्हण आक्का, म्हायेरच्या माणसाच्या बाबतीत तुला आपलेपनाच -हायलेला न्हाई", यावर तिने जे उत्तर दिले आहे. त्यात तिचा आजवरचा सगळा राग व्यक्त होतो. कटू सत्य ती बोलत असल्याने भावाला हे अनपेक्षित वाटते. ती म्हणते, "....दिवाळी जवळ आली, पंचीम जवळ आली की म्या किती वाट पाहायची मुराळ्याची. कवा मुराळी येतो आन कवा बघा म्या म्हायेरी जाते असं वाटायचं मला. पर तवा हिकडं ढुंकूनबी बगितलं न्हाईस. आता काम पडलं तवा मातर याद आली माजी."[३४] या शब्दात भावाच्या वागणुकीची स्पष्ट जाणीव त्याला देते. बायकोच्या अतिहस्तक्षेपाने बहिणीपासून तो कसा तुटत चालला आहे याची जाणीव त्याला करून दिली जाते. भावाची तारांबळ उडते. त्याचा बेरकीपणा इथे उपयोगी पडत नाही. शेवटी तो आल्यापावली रिकाम्या हाताने परत जातो. जाताना भावाला दशम्या करून द्यायला ती विसरत नाही. प्रसंग कितीही कटू असला तरी सगुणा बहिणीचे प्रेम कमी होऊ देत नाही.

भरलेल्या डोळ्यांनी भावाच्या जाणा-या गाडीकडे पहाण्याशिवाय तिच्या हाती काहीच उरत नाही. रा.रं. बोराडे यांनी नागनाथ कोत्तापल्ले यांना दिलेल्या मुलाखतीत एकूण मराठी ग्रामीण कथेच्या दृष्टीने आपले वेगळेपण सांगताना म्हटले आहे की, "ग्रामीण समाजातील "नातीगोती" विशेषत: ग्रामीण मराठी समाजातील नात्यागोत्याचे संबंध व या संबंधातून निर्माण होणारे ताणतणाव माझ्या कथांमधून आलेले आहेत. शिवाय ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या जीवनातील विविध स्वरूपाची दु:खे स्वाभाविकपणे माझ्या कथांमधून आलेली आहेत."[३५]

वडिलधाऱ्यांच्या भांडणामुळे झालेली कुचंबणा:

पुरुषांच्या अहंकाराच्या कल्पनेलाही बळी पडलेल्या काही स्त्रिया बोराडे यांच्या कथांमधून दिसतात. त्यांचा अल्पसा दोष जन्मभराची शिक्षा स्त्रियांना देऊन जातो. या प्रतिष्ठेच्या कल्पना बऱ्याचदा अवास्तव असतात. "धाक" कथेमध्ये दोन व्याही एकमेकांशी भांडतात. साधू-सुनाही एकमेकींशी भांडतात व जन्माचे दु:ख पदरी बांधून बसतात.

दोन व्याह्यांनी आपल्या प्रतिष्ठा मोठया मानल्या की मुलांच्या, सुनांच्या भावनांची कुचंबणा होते. हातातला तांब्या पडला त्यावरुन शेवंताची साधू सारजाबाई, "तांब्या फुटला बिटला तर काय तुझा बाप आणून देणार काय ?"[३६] एवढे बोलते. इथूनच साधू-सुनाच्या संघर्षाला सुरुवात होते. कुणाही स्त्रीला तिच्या माहेरच्या माणसांबद्दल बरे-वाईट बोललेले खपत नाही. तिला याचे दु:ख होते. साधू एवढयावेच भांडण करते. नवऱ्याजवळ सांगते की एकतर या घरात मी राहीन नाहीतर ती राहील. हा अतिरेकी विचार यशवंतरावांची कोंडी करतो. त्यातून ते मार्ग काढतात की काही दिवसांसाठी शेवंताला माहेरी पाठवावे. आज ना उद्या बायकोचा राग शांत होईल मग सुनेला पुन्हा आणावे. पण हाच प्रकार अंगाशी येतो.

तडजोड करुन प्रश्न मिटविण्याचाही प्रयत्न होतो. शेवंता कबूलही करते की, "आत्याबाय जसं वागवित्याल तसं वागायला तयार हाय म्या."[३७] सुनेची तडजोडही साधूला अमान्य. शेवंताचे वडील तानाजीराव हे सुध्दा हा प्रतिष्ठेचा प्रश्न करतात. लेकीच्या आजवर झालेल्या छळाचा पाढा

वाचतात. व यापुढे जर जावई बळिराम वेगळा निघत असेल तरच माझी मुलगी नांदेल अन्यथा मी तिला माहेरी घेऊन जाईन असे सुनावतात.

बायकोला सर्वात मोठा आधार नव-याचा असतो. त्याच्या-पायी ती काहीही सोसण्याची तयारी दाखवू शकते. परंतु बळिराम गप्प रहातो. उलट दटावतो. तो विरोधही करीत नाही. शेवंताची नव-याकडून एवढी अपेक्षा असणे रास्त असते पण इथेही तिची निराशा होते. ती बापाबरोबर माहेरी जायला तयारही नसते. पुन्हा वडिलांचा धाक आहेच. म्हणजे कधी सासू, कधी सासरा, कधी बाप तर कधी नवरा आणि कधी कधी परिस्थिती तिला अगतिक करते. त्यामुळे तिच्या मनाचा कोंडमारा होतो. दु:ख पेलण्याची जबाबदारी स्त्री म्हणून शेवंताकडेच येते. सासू-सुनांच्या संघर्षाचे काही क्षण पुढे आयुष्यभरासाठी दु:खाचे ताट वाढून ठेवतात.

<u>रंग रुपामुळे झालेली कुचंबणा:</u>

मन घट्ट ठेऊन, सारे सोसण्याची तयारी असणारी स्त्री रंगरुपाने कशी आहे, ती दिसायला काळी की गोरी हा प्रश्न वास्तविक उपस्थितच होऊ नये. पण तिचा शारीरिक रंगसुध्दा तिच्या दु:खाचे कारण ठरु शकतो. मनाने नव-याला जपणारी, त्याला शरीर समर्पण करणारी स्त्री काळी आहे म्हणून लग्नानंतरही नाकारली जाते. हा तिच्या स्त्रीत्वावर होणारा अन्यायच आहे. जीवघेण्या अपमानाचे घोट पचवि-ण्यासाठीच स्त्रीचा जन्म असावा असे वाटण्याइतपत सहनशीलता "सिमंता" कथेतली सिमंता दाखविते.

सिमंताची काहीही चूक नसताना तिची कुचंबणा होते. निसर्गाने दिलेला काळा रंग तिला अस्वस्थ करतो. नवरा वडिलांनाही सुनावतो.

त्यांचा अपमान करतो. म्हणजे वडिलांनीही हे गृहीत धरले आहे की, तिला सगळे आयुष्य असेच जळत रहावे लागेल. इथेही सिमंताचे काळेपणा पुढे करुन तिच्या स्त्रीत्वाला वेठीला धरले जाते. ती काळी आहे यात तिचा काहीच दोष नसतो. निदान लग्नानंतर तरी हा प्रश्न उद्भवायला नको होता. पण आता तर नवराही नांदवायला तयार नाही. संघर्ष सासरा-जावई यांच्यात. पण खरा पेच सिमंतालाच आहे.

एवढे सारे होऊनही तिच्यामनात नव-याबद्दल अजिबात कटुता रहात नाही. वडिलांबरोबर माहेरी जाताना ती नव-याच्या पाया पडते. तिच्या सुसंस्कारित मनाचीच ही खूण आहे. तिच्या शरीराचा काळेपणा फक्त नव-याला दिसतो. पण दुर्दैवाने तिच्या मनाचा मोठेपणा त्याच्या लक्षात येत नाही. सासरे आत्मक्लेश करुन घेतात आणि सिमंताचे माहेरी जाणे रद्द होते. संध्याकाळीही तो तिला अंगाला हात लावू देत नाही. तोडून बोलतो. लग्नानंतर ज्याला आपला म्हणावा असा एकमेव आधार म्हणजे नवरा. त्यानेच अशी हेटाळणी केल्यावर सहानुभूतीचे सगळे रस्तेच बंद होतात. तिच्या दु:खाची जबाबदारी तिच्या नव-याशिवाय कुणावरही टाकता येत नाही. त्याचे वागणेच असे विचित्र आहे की तिला मुकाट्याने ऐकून घ्यावे लागते.

मानपानामुळे होणारी कुचंबणा:

गावात आपली प्रतिष्ठा टिकविण्यासाठी बरेच पैसेही खर्च करावे लागतात. कधी कधी ऐपत नसतानाही पैशाची उधळण करावी लागते. असे पैसे जमा तरी कुठून करायचे. सासरा हा एकमेव घटक अशा वेळी आढळतो आणि अप्रत्यक्षपणे वसुलीला सुरुवात होते. प्रत्यक्ष पैसे

मागणे शक्य नसते म्हणून बायकोलाच वेठीला धरले जाते. "रूसवा" कथेतल्या सावित्रीचे नेमके हेच होते.

आपल्या कथालेखनासंबंधी मनोगत व्यक्त करताना रा.रं. बोराडे यांनी ग्रामीण समाजरचनेतील मराठा समाजातील लोकांच्या या स्वभावाच्या ओढाताणी विषयी लिहिले आहे. ते म्हणतात, "या समाजात जावयाचं विलक्षण प्रस्थ. त्याला हवं तसं तो वागू शकतो, आणि त्यानं कसंही वागलं तरी या नात्यानं त्याला दिलेला हा हक्क आहे असं मानतात. त्याचं असं वागणं साधारणत: करणीच्या संदर्भात घडतं. सासरच्या लोकांकडून त्याला करणीची अपेक्षा असते. त्याच्या या अपेक्षेला कसलीच मर्यादा नसते. त्याच्या इच्छेला येईल तितकी मागणी तो करू शकतो आणि अशी मागणी करण्याचा त्याला हक्क आहे असं मानलं जातं. त्याच्या या मागणीला मर्यादा नसल्यामुळं ती पुरी करणं सहसा शक्य होत नसतं. आणि त्यामुळं सासरच्या लोकांवर त्याचा राग असतो. हा राग तो निरनिराळ्या मार्गांनी जरी व्यक्त करीत असला तरी त्याच्या रागाचं खरं केंद्र त्याची बायको असते. अशा परिस्थितीत तिची विलक्षण कोंडी होते. ओठावर ओठ दाबून ती सारं काही सोशीत राहते."[३८]

"रूसवा" कथेत जावयाला सासऱ्याकडून पैसे हवेत. पण ते प्रत्यक्ष कसे मागायचे म्हणून तो सावित्रीला स्वत:च माहेरी घेऊन जातो. अगोदर कसलीही पूर्वसूचना ते देत नाहीत. उलट जर पैसे दिले नाहीत तर मुलीला नांदवायला नेणार नाही असा दमही बायकोमार्फत देऊन ठेवतो. पैशासाठी बायकोला वेठीला धरतो. पुन्हा स्त्रियांचा उपयोग प्रतिष्ठेसाठी, पैशासाठी केला जातो. वडील हणमंतरावांची विचित्र अवस्था होते. पैसे न द्यावे तर लेकीच्या आयुष्याचे काही खरे नाही. पैसे द्यावेत तर ते परत येण्याची मुतराम शक्यता नाही. मुलगी मात्र बापाला स्पष्ट सुनावते की, "....जाव द्या गेले तर,

पर एक पयसा दिऊ नका त्यानला. एकदा का तुमी अश्यानं देतावं म्हणून त्यानला क्ललं तर ते सोकावून बसतेल. दर बारीला ते मला आसं आनतेल आनू पैसे घाल तवा न्हेतो म्हनतेल."[३९] नव-याच्या स्वभावाची तिला पूर्ण कल्पना असूनही ती असाहाय्यच ठरते.

मानापमानाच्या कल्पनांचे प्रस्थ इतके असते की त्या कधी पाळाव्यात व कधी पाळू नयेत यालाही काही मर्यादा उरत नाही. त्याचाही अतिरेक होतो. "गाठोडं" कथेमध्ये जनाई मृत्यूच्या उंबरठ्यावर असतानाही पहिल्यांदाच सासुरवाडीला आलेल्या जावयाचे कौतुक केले जाते. तेव्हा परिस्थितीचे भान न ठेवताही जावयाचे मोठेपण मान्य केले जाते. ही रूढीच विचित्र वाटू लागते.

सगळे घर जनाईच्या आजाराने चिंताक्रांत असताना अचानक जावई लेकी बरोबर येतो, आणि त्यामुळे जनाईच्या आजारापेक्षाही त्याच्या मानापानाच्या आणि आहेराच्या रूढीलाच प्राधान्य दिले जाते. जनाई सुध्दा एक स्त्रीच असल्याने स्वत: मृत्यूच्या दाढेत असतानाही हाच विचार करते की माझे काही खरे नाही. पण आज आपण आहेर केला नाही तर लेकीला तिकडे "जाच-भाज" होईल. या प्रसंगी आईची मायाही दिसते व रूढी पाळण्यासाठी केलेली जिवापाड धाडपडही दिसते. जावयाचे येणे हा आनंद न ठरता संकटाचाच भाग ठरतो.

बिचारी रुक्मिणी असहाय आहे. एकतर तिला नव-याला तुम्ही येऊ नका असे सांगता येत नाही आणि आई-बापांना थोपवून धरता येत नाही. रुक्मिणी आणि जनाई या दोघींचीही भावनिक ओढाताण खूप होते. सासरा आणि जावई यांच्या संघर्षात मुलगी रुक्मिणीची फार पंचाईत होते. आपल्या आईपेक्षा जावयाला महत्त्व द्यावे लागते आहे

हे तिला पटत नाही. ती म्हणते, "आबा, खरंच तुमी मायला दवाखान्यात न्हयायचं करा. हयेनी काय बी करु द्या मला. मायच्या जीवापरीस काय जास्त न्हाई आलं."[४०] तिच्या मनाला हे पटलेले आहे की आई वाचली पाहिजे. नवरा कितीही छळू लागला तरी आपण सोसू. पण आई पुन्हा मिळणार नाही. पण तिचे कुणीच मनावर घेत नाही. ज्या बैलगाडीतून जनाईला तालुक्याच्या दवाखान्यात न्यायचे असते त्याच गाडीतून जावयाला आहेर आणण्यासाठी सासरे लिंबाजीराव निघतात. पराभूत होण्याची पाळी स्त्री म्हणून पुन्हा रुक्मिणीवरच येते. हे न पेलता येण्याजोगे दु:खही पेलण्याची तिला तयारी करावी लागते. सासरची माणसं दुखविणं केव्हाही चांगलं नसतं हे त्यांना माहीत आहे. म्हणून पुतळा अगतिक आहे. ती एक शब्दही बोलत नाही. दोन मोठ्या माणसांच्या संवादात बायकांनी आणि त्यातही सुनेने तोंड उघडायचे नाही ही परंपराच आहे. पुतळाची अवस्था चुंबळेसारखीच होते. सासरचे दु:खाचे ओझे, माहेरच्या डोक्यावर नको म्हणून ती मध्येच चुंबळ होते. सारे सोसते. एक अक्षरही बोलत नाही. वडिलांशी देखील ती बोलू शकत नाही. बोराडे यांनी संयमाने तरीही नेमकेपणाने स्त्रियांची कुचंबणा कशी होत रहाते याचे चित्रण केले आहे.

बोराडे यांनी खेड्यातल्या स्त्रियांचा अगतिकपणा कथाविषय करुन मराठी ग्रामीण कथेला अधिक सूक्ष्माकडे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. यापूर्वी हे चित्रण तितक्या सकसपणे आलेलं नाही याची बोराडे यांना खंत वाटते. पुढे ते म्हणतात, "खेड्यातील शेतकरी शेतमजूर स्त्रियांचं वास्तव चित्रण ज्या प्रकर्षानं व प्रभावीपणे मराठी ग्रामीण वाङ्मयात यावयास हवं होते. त्यानुसार ते आलेलंच नाही. खेड्यातल्या या स्त्रियांकडं नेहमीच शृंगार किंवा विनोदविषय म्हणून ग्रामीण कथेनं पाहिलेलं आहे. श्री. व्यंकटेश माडगूळकर किंवा श्री. शंकर पाटील यांच्या ग्रामीण वाङ्मयातून खेड्यातल्या

स्त्रीच्या वास्तव जीवनाचं चित्र आलेलं, असलं, तरी ते पुरेशा प्रमाणात आलेलं नाही. ग्रामीण भागातल्या स्त्रियांना सर्वस्वी घरातल्या पुरुषावर अवलंबून राहावं लागत असल्यामुळं त्यांना स्वतंत्र जीवन जगताच येत नाही. घरात त्यांना नेहमीच दुय्यम स्थान असतं. "रांडवपणाचं" किंवा "नव-यानं टाकून दिलेलं जीवन" तिला जगावं लागतं. तेव्हा तर तिचं दु:ख अधिकच गडद अधिक जीवघेणं असतं. माझ्या कथांतून अशा अनेकविध स्वभावाच्या स्त्रिया आलेल्या आहेत."४१

दु:ख आपल्याच वाटयाला का आले याची कारणमीमांसा करण्या-पेक्षाही "हे आपल्याच वाटयाचे आहे आणि ते आपणच भोगले पाहिजे" अशी मनाची तयारी या स्त्रिया करताना दिसतात. दोन व्याह्यांच्या प्रतिष्ठेच्या भांडणात आपल्या शरीराची, मनाची कुचंबणा होते म्हणून भांडणा-या माणसांना इथली स्त्री कधी दोष देत नाही की जबाबदारही समजत नाही. ही दैववादी विचारसरणी हा यांच्या जीवनाचा स्थायि-भावच होऊन बसतो. "बांध" कथेतल्या चंद्रभागेची जी घालमेल होते त्यालाही घरातली वडिलमाणसेच पूर्णत: जबाबदार आहेत. पण तसा साधा उल्लेखही ती करीत नाही.

तिची असहायता तिला बोलून दाखविणेही अवघड झाले आहे. त्याचे कामात लक्ष लागत नाही म्हटल्यावर तिलाही आतून कुठे तरी वाटत रहाते हे असे किती दिवस चालणार ? "भोगवटा हाय तो काय चुकत असतो का ?"४२ हे तिचे उद्गार पोक्तपणाचे वाटले तरी वयापेक्षाही परिस्थितीने तिला अधिक शिकविले आहे. शहाणे केले आहे. जगण्या-तल्या आनंदाची ओळख होण्यापूर्वीच तिला त्या जगापासून दूर व्हावे लागते. मन मारावे लागते. त्यातही ती विश्वनाथाचे मन जपण्याचा प्रयत्न करते.

वैधव्यामुळे झालेली कुचंबणा:

नवरा असूनही त्याला भेटता न येणाऱ्या स्त्रीची व्यथा बोराडे मांडतात तशीच नवरा अचानक मरून जातो, त्याच्या बायकोला अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. "मांडव" कथेतील पद्मा आपल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर एकाकी होते. जगण्याचे बळकट साधन हाताशी नाही. मूलबाळही नाही. अशा अवस्थेत "विधवा स्त्री" म्हणून दिवस काढणे अतिशय जिकिरीचे काम असते.

यशवंता हा त्या गावातला एक तरुण. अचानकपणे त्याचीही बायको मरते आणि तो विधुर होतो. त्याला असे वाटत असते की आपण पद्माला या संबंधी विचारून नव्याने प्रपंचाला लागू. यापूर्वी त्यांचे लग्नही ठरलेले असते पण मानपानाच्या, हुंडयाच्या कल्पनेने ते लग्न रद्द होते. दुर्दैवाने दोघेही आपला जोडीदार गमावतात आणि एकमेकांना भेटतात.

वेलीच्या मांडवासाठी वासे मागण्याचे निमित्त करून यशवंता येतो. इथला मांडव सूचक आहे. पतीच्या मृत्यूने दुःखी झालेली पद्मा अतिशय सावध आहे. पुरुषाची नजर ओळखण्याची जन्मजात शक्ती निसर्गाने स्त्रीला दिलेलीच आहे. पतीच्या मृत्यूनंतर मी वेलाकडे लक्ष दिले नाही. मांडवही जाळला हे ती सांगते. ययशवंता हर प्रकाराने हे पटविण्याचा प्रयत्न करतो की, तुम्ही एकटयानेच राहणे कसे असुरक्षित आहे. त्याने दुसऱ्या लग्नाचा विचार बोलून दाखविताच ती स्पष्ट शब्दात नकार देते. भाऊबंदांचेही ती ऐकत नाही. याच्या मुळाशी तिने आपल्या पतीला शब्द दिलेला असतो व तोच पाळणे तिला आवश्यक वाटते. ती म्हणते, "....म्या गेल्यावर क्टीत एकादं पोरगं घे आन माजं नाव चालीव म्हनले."[४३] वंश

चालला पाहिजे ही भावना यात महत्त्वाची आहे. वंशाला दिवा पाहिजे ही ग्रामीण समाजमनातली एक समजूत आहे. राहिलेले सगळे आयुष्य मेलेल्या पतीच्या शब्दाखातर एकट्यानेच साजरे करायचे ती ठरविते. शब्दाची ती पक्की आहे. त्याच्यापुढे शारीरसुखाच्या सगळ्या कल्पना तिला फिक्या वाटतात. यापुढे भूतकाळाचे पापुद्रे उलगडण्यातच तिला सुख शोधावे लागणार याची तिला पूर्ण कल्पना आहे. आपल्या आयुष्याविषयीचा तिचा एकटीचा निर्णय तिला नैतिक-दृष्टया मोठे करतो. आणि बरोबरच सुखाचे सगळे दरवाजे बंदही करतो. तरीही ही कथा रोमँटिक होत गेली असे म्हणावे लागते.

घराचा कर्ता पुरुष हा कुटुंबाचा मोठा आधार असतो. प्रसंगी कुठल्याही संकटातून वाट काढायला तो तयार असतो. पण दुर्दैवाने तोच अर्ध्यातून उठून गेला तर त्या कुटुंबाची वाताहत होते. नातेवाईक आस्थेने विचारपूसही करीत नाहीत. मग मदत करायचे तर दूरच. त्यात जर दुष्काळासारखे जीवघेणे संकट आले तर ग्रामीण जीवनात फार अस्वस्थता निर्माण होते. स्त्रीचित्रातले हे वेगळेच दर्शन बोराडे घडवितात. नातीगोती, वत्सलता ही सुकाळाची अपत्ये असतात. दुष्काळात हीच अपत्ये अवघणीची ठरतात.

विषम वयाच्या पतीमुळे झालेली भावनिक कुचंबणा:

अन्न आणि वासना या मानवीजीवनाच्या दोन अपरिहार्य भूका आहेत. भूक शारीरालाही लागते आणि मनालाही. दोहोंचीही तृप्ती होणे हा अपरिहार्य मानले जाते. पण सतत दुष्काळाच्या साक्लीत वावरणाऱ्या ग्रामीण जीवनाला पोटाची भूक भागविणे अशक्य होऊन बसते. स्त्री आणि पुरुष दोघेही असहाय होतात. वासनेची भूक

न भागल्याने. पण समाज मनाच्या प्रचंड दबावाखाली वावरणाऱ्या या स्त्रिया वासनेलाही गाडून टाकतात. या ही दृष्टीने त्यांची कुचंबणा होत रहाते. बोराडे यांनी वासनेची अनेक चित्रे अतिशय संयमाने आपल्या कथातून चितारली आहेत. बऱ्याचदा स्त्रियांच्या उपासमारीला, वासनेच्या अतृप्तीला कुटुंबच कारणीभूत असलेले पहायला मिळते. जरी भावनिक उपासमार झाली तरीही या स्त्रियांचा सांस्कृतिक धर कुठेही सुटत नाही. यातही तोल सावरण्याची कसरत स्त्रियांना करावी लागते. अन्न आणि काम हे एकमेकांना अगदी खेटून उभे आहेत हे मात्र आपण नाकारु शकत नाही.

शारीरसुखाची ओढ तारुण्यात उपजतच असते. पण जसं जसे वय अधिक होत जाते तसतसे हे आकर्षणाही कमी होत जाते. विषमवयाच्या जोडीदाराची गाठ पडल्यावर मात्र वासनेला आवर घालणे भाग पडते. मनाला मारण्याची कितीही सवय असली तरीही शारीर बंड करुन उठते. अशा वेळी कष्टाच्या कामात त्या शारीराला गुंतविले जाते. दमविले जाते. "भोग" कथेतल्या सरस्वतीची कुचंबणा शारीरदृष्ट्याच अधिक होते. तिचे सगळे प्रयत्न व्यर्थ ठरतात.

अर्ध्याहून अधिक वय झालेला बा आणि तारुण्याने बहरलेली सरस्वती यांचा सूर जुळत नाही. वंशाला दिवा असावा यासाठी बा ने सरस्वतीशी लग्न केलेले असते. दोघांच्या वयात खूप अंतर असते. त्यामुळे ही समस्या सरस्वतीच्या आयुष्यात नवे दुःख निर्माण करते. एकेकाळी टेचात चालणारा, पायाखाली जमीन दाबणारा बा आता दमला आहे. त्याची चाल मंद झाली आहे. भुवयाही पांढऱ्या झाल्या आहेत. चेहराही तरटाच्या तुकड्यासारखा दिसत आहे. उलट सरस्वती तरुण आहे. तिची मैत्रीण तिला म्हणाते, "एक लेकरु झालया म्हनून तुला बाई म्हनायचं आलं.

लेकरु झालं नसतं तर अजूनबी तुला हुळूमुळू खेळायला नदीवर धावावं लागलं असतं."[४४] या उद्गारावरुन तिच्या तारुण्याची कल्पना येऊ शकते.

नव-याच्या विझत चाललेल्या वासनेला चेतवण्यासाठी ती त्याच्या चहात साय घालते. त्याला लसूण, कांदा वाऊ घालते आणि सतत अप्रत्यक्षपणे आपल्याला काय हवे आहे याची जाणीव करुन देते. स्वत: मीठ खायचे सोडून देते. जेणे करुन आपल्या वासनांना काबूत ठेवण्याचाही ती प्रयत्न करते. नव-यालाही याची पूर्ण कल्पना असल्याने त्याला सतत अपराध्यासारखे वाटत असते. सरस्वती शृंगार भावनेच्या दृष्टीने दुर्दैवी ठरते. विषम वयाच्या विवाहामुळे सरस्वतीला या दु:खाला सामोरे जावे लागते. रात्री जेवणानंतर तो देवळात झोपायला जातो तेव्हा मात्र ती फारच अगतिक होते. नवरा म्हणतो, "हितं झोपलो काय आन तिथं झोपलो काय, दोनीबी सारकंच तुला."[४५] यावर रडण्याशिवाय तिच्या हाती काहीच नसते. तिला अतृप्तच रहावे लागते. तरीही ती आपल्या चारित्र्याला जपते. संयम सुटू देत नाही. वंशाला दिवा लागला हे समाधान जितके व्यक्तिगत तेवढेच सामाजिकदृष्टयाही प्रतिष्ठेचे असते. ही प्रतिष्ठा याही अवस्थेत सरस्वती सांभाळते. स्वत: दुखी राहूनही. त्यात तिला कधी व्यभिचार करावा वाटत नाही.

आपल्या शरीरबळाला जिरविण्यासाठी ती रात्रीच दळण दळायला घेते. वासनेला कामाच्या रगाडयात गुंतवून टाकते. त्याची तीव्रता कमी करते. वंशासातत्याच्या हट्टापायी आयुष्याच्या मध्याच्या पुढे लग्न केलेल्या वृध्द पुरुषाच्या तरुण बायकोची मानसिक आणि शारीरिकदृष्टया जी उपासमार होते त्याचे चित्रण फार सूक्ष्मपणे बोराडे यांनी केले आहे. रा.रं. बोराडे यांनी "भोग" कथेच्या संदर्भात असे म्हटले आहे की, "भोग" ही

कथा अशीच मानसिक पिंजणातील भाववृत्ती व्यक्त करणारी कथा होय. वय झालेला नवरा आणि उफाडयाच्या वयातील त्याची बायको यांच्यातील वासनात्मक द्वंद्वाचा संघर्ष आणि या संघर्षात सापडलेल्या लहान, अजाण मुलाचे भाबडे निवेदन, यामुळे या कथेला लाभलेले परिमाण निश्चितच कथाविश्वाला स्वतंत्र प्रायोगिक मूल्य देणारे आहे."[४६]

एकाकीपणामुळे झालेली कुचंबणा:

भरल्या संसारातून अचानकपणे नवरा बेपत्ता होतो. अशा वेळी बायकोची अवस्था मोठी विचित्र होते. ग्रामीण भागात आधीच रोजगारासाठी वणवण, त्यात असले संकट आले तर मन:स्थिती बिघडून जाते. जगण्याची उमेदही रहात नाही. "खेळ" कथेमध्ये गुंजाबायचे नेमके हेच दु:ख आहे. ती ही वयाने तरुण आणि विनाअपत्य आहे. अचानकपणे कुणा तरी बुवाच्या नादी लागून नवरा घर सोडून जातो. तिला कुणाचाच आधार नाही. जगण्याचे साधन म्हणजे रोजंदारी एवढेच आहे.

गुंजाबायची समस्या फारच वेगळी आहे. एकेदिवशी आपल्याला कामाला येता येणार नाही हे सांगायला ती निवेदकाच्या माय कडे येते. तिला बरे वाटत नसते. नव-याचा तपास न लागल्याने ती अस्वस्थच आहे. मनच आजारी आहे त्यामुळे शरीरात काम करण्याइतका जोम शिल्लक राहणे शक्यच नाही. गावातल्या पंचांग पाहाणा-या रामबावाने तिला दुपारी घरी कुणी नसताना तू ये असे सांगितल्याने माय खूप चिडते. गुजा एकटी असल्याने तिच्याविषयी वासनायुक्त विचार त्याच्या मनात येतात. तरीही गुजाबाय शांतच आहे. ती सोसते. रामबावाला नावे ठेवत नाही.

पोटात अन्नाचा कण नाही. अशा अवस्थेत गुजा रात्र रात्र जागत बसते. शरीराची भूक न भागल्याने ती अतृप्तच रहाते. माय तिला म्हणते,

"तुला तरी काय म्हनावं माय गुजे. तुजे वय हे आसलं. त्यातनं वरीस झालं गडीमानसाचा ढका न्हाई का वारा न्हाई. तू तरी आता हे कंवर सोसाव ?"[४७] यावर गुजा मनोगत व्यक्त करते. ते तिच्या अस्वस्थपणाला वाट करुन देते. ती म्हणते, "तरी बी म्या मोप मन मारते सोनाक्का. कवा रातर रातर भुतावानी घरात काम करीत बसते. वाटतं, दोडाचं अस्यानं तरी मन काबूत -हाईल. मनाला जरा इसर पडंल. एकांद्या कती तसं व्हत बी, पर एकांद्या बारीला सारं अंग जळाया लागतं. आग आग व्हाया लागती अंगाची. मंग येळकाळ ठिवते बाजूला तस्या टायमाला बदाबदा अंगावर पानी वतून घेते. आता तुमीच सांगा. कंवर म्या आसं मनाला मारावं ? कंवर म्या आसं जिवा आगूज दुकनं सोसावं ? "[४८] नव-याशिवाय जगणे म्हणजे उकळत्या काहिलीत जगण्यासारखे आहे. माय आणि गुजा दोघीही दैववादी आहेत. आज ना उद्या तुझा नवरा परत येईल असे मायला वाटते. तर आपला भोगवटा आपणच भोगला पाहिजे ही गुजाची पक्की समजूत आहे. दोघीही एकमेकींना जपतात. स्त्रियांची दु:खे काय असतात हे स्त्रीच समजू शकते.

मनातल्या वासना कितीही दाबल्या तरी थोडीसी संधी मिळताच त्या उफाळून येतात. निवेदकाबरोबर खेळ खेळतानाच निवेदकाच्या जागी तिला तिचा पळून गेलेला नवरा दिसू लागतो. "तू व्हय.... चल हूं घराच्या भाईर. सोताजवळ हिंमत न्हवती तर कस्याला आनलंस मला हितंवर ? असा का अध्यार्-वरच खेळ टाकलास ?"[४९] या तिच्या उद्‌गाराने हेच दाखवून दिले आहे की अजूनही मनाने ती नव-याच्या बरोबरच वावरते आहे. ती हळू हळू हिंस्त्र बनत जाते. केस विस्कटते. कपडे अस्ताव्यस्त होतात, भांडी, गाडगी फुटतात. मनाच्या तळघरात कोंडलेली वासना रौद्र रुप धारण करते आणि तिला

दमवते. पहाता पहाता तिचा तोल जातो. या चालत्या बोलत्या जगातून ती दुस-याच कुठल्यातरी जगात गेल्यासारखी वावरते. तिला हे सोसवत नाही. म्हणून शेवटी तोंडावर आपटून ती शांत होते. तिच्या दबलेल्या दु:खाला वाट मिळताच ती बदलते. साध्या खेळातून सुरु झालेल्या कथा तिच्या दु:खाने गंभीर रुप धारण करते. ग्रामीण भागातील स्त्रीचे हे एकाकीपणाचे दु:ख टिपून बोराडे यांनी आपले कौशल्य सिध्द केले आहे. तिच्या जगण्याचा, हिंस्त्र होण्याचा व पुन्हा नॉर्मल होण्याचा तोल सांभाळला आहे. तिचा जो मानसिक छळ होतो त्यामुळे जी अस्वस्थता तिला प्राप्त होते तीही शब्दबध्द केली आहे.

प्रास्ताविक (

(ब) पुरुषांच्या असहायतेचे चित्रण करणा-या कथा:

रा.रं. बोराडे यांच्या कथांमधून स्त्रियांच्या अनेकपदरी दु:खाचा वेध घेतलेला आपणास पहावयास मिळतो. त्याचप्रमाणे त्यांच्या कथांमधले पुरुषही अडचणीत सापडतात. ब-याचदा कुटुंबाचा कर्ता या नात्याने त्याला आपले दु:ख बोलून दाखविता येत नाही. हे जसे खरे आहे त्याचप्रमाणे त्याला आपली जबाबदारीही टाळता येत नाही. समाजबंधने, रुढी, ग्रामरहाटी यामुळे त्यालाही अगतिक करील अशी परिस्थिती निर्माण होते. जात्याच पुरुष असल्याने त्याला रडूनही आपले दु:ख व्यक्त करता येत नाही. आधीच प्रतिष्ठेच्या कल्पनांमुळे तो गोत्यात आलेला असतो. त्यात जर दुष्काळासारखे एखादे संकट उभे राहिले तर त्याची फारच अडचण होते. ते असहाय होतात.

बोराडे यांच्या कथांमधील अशा असहाय पुरुषांच्या कथांचा विचार करु.

"नातीगोती" या संग्रहातील "झळ", "मुरडण", आणि "मळणी" संग्रहातील "लागेबांधे", "बांध", "मळणी", "पौरुष" आणि "सौदा" या कथांमधून प्रामुख्याने पुरुषांची अगतिकता जाणवते.

पत्नीच्या मृत्यूने आलेले कुचंबलेपण:

मृत्यूचे दु:ख हे अकल्पित असते. एखाद्याच्या अचानक जाण्याने ह्या कुटुंबाची घडी विस्कटून जाते. त्यातल्या त्यात घरातली कर्ती स्त्री मरण पावली तर त्या घराचे अस्वास्थ फारच तीव्र स्वरुपाचे असते. "झळ" कथेमध्ये महिन्याभरापूर्वीच बाळंतपणात मृत्यूमुखी पडलेल्या पत्नीच्या दु:खाने मलूल झालेला बाबाराव पुन्हा लग्नाच्या वाटाघाटी करायला प्रवृत्त झालेला असतो. लहान दोन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारणारे कुणीतरी बाईमाणूस घरात असणे फार गरजेचे असते. म्हणूनच पहिल्या बायकोच्या मृत्यूनंतर लगेचच तो विवाहाची जुळणी करु लागतो. विधुराचे दु:ख न सांगता येण्यासारखे असते. ते सोसणेही कठीण आणि सांगणेही कठीण होऊन बसते.

किसना शिंदे त्याच्या भाचीसाठी पाहुणा होऊन येतो. ही मुलगी दिसायलाही चांगली "आकाशी नकीतरावनीच" असते. बाबारावला पसंतही असते. पण अचानक सासरा मेहुणीसह येतो आणि आधी आलेल्या पाहुण्यांना काही ना काही सबबी सांगून टाळावे लागते. हा निर्णय बाबारावाने मनापासून घेतलेला नसतोच. पण तेवढ्या काळात सास-याचे फटकून वागणे आणि मुलांचे मेहुणीला बिलगून रहाणे त्याला

हा निर्णय घ्यायला भाग पाडतात. मावशीला बाबाराव जेव्हा सल्ला विचारतो तेव्हा ती सांगते, "... तुज्या दृष्टीनं बगितलंस तर किसनाची भाचीच चांगली हाय. जोडाबी चांगला लागंल. आन् घा तितं पाच पयसे दील बी तो. पर लेकराच्या द्रष्टीनं म्हणलास तर मेव्हनीच बरी पडल तुला. जल्माचा बनवास चुकंल लेकरांचा."[५०] मावशीचे हे अनुभवाचे बोलणे आहे. पण हे लग्न दुसऱ्याचे आहे. त्यामुळे त्याला फार सावधपणे आणि दूरदृष्टीने निर्णय घेणे भाग पडते. शिंध्याची भाची दिसायला चांगली असली तरी तिच्याशी लग्न करता येत नाही आणि मेहुणी रंगाने काळी आणि पदर न आलेली असली तरी तिच्याशीच त्याला लग्न करणे भाग आहे. निर्णय त्याला घ्यायचा असला तरी खरा निर्णय परिस्थितीच घेते. तो फक्त निमित्त ठरतो. उलट सासरा एवढीशी मुलगी आपल्या बायको म्हणून देतो आहे यात सासऱ्याचा मोठेपणाच आहे हे ही बाबाराव बोलून दाखवितो. मुलांच्या भवितव्यासाठी तो स्वत:ची इच्छा मारतो म्हणतो की, "... मग काय करावं तर, समद्याच गोष्टी बगाव्या लागतात. निसते पावने घरी आले तर ढुंकून बगायचा न्हाई तो. हिकडूनबी लेकरं बनवासी व्हतेल आन् तिकडूनबी लेकरं वनवासी व्हतेल."[५१]

त्याच्या इच्छेला इथे काहीच किंमत उरत नाही. आपल्या लेकरांपुढे आपले सुख त्याला महत्त्वाचे वाटत नाही. मुलांच्या सुखापुढे स्वत:च्या शारिरसुखाचा होम बाबारावला करावा लागतो. आता त्याचे जगणे स्वत:-पुरते उरतच नाही. मुलांच्या भवितव्याशी त्याचे भविष्य बांधलेले आहे. काहीही कुरकूर न करता मूकपणे या दु:खाला तो सामोरा जातो आहे.

पत्नीच्या मृत्यूने अगतिक झालेला आणखी एक पुरुष "मुरडण" या कथेत बोराडेयांनी रंगविला आहे. सोपानाहीशेतमजूरच आहे. त्याला आठ-नऊ वर्षाची मुलगी आहे. अजूनही त्याचे लग्नाचे वय असल्याने तात्याराव सारखी किंवा सोपानाच्या मालकासारखी मंडळी त्याला लग्नाच्या भरीला घालण्याचा प्रयत्न करतात. त्यालाही दुस-या लग्नाची इच्छा असतेच पण मुलीच्या लग्नाचा विचार त्याला आधी करणे भाग असते. त्यासाठी त्याची सतत धडपड चाललेली असते. आर्थिक दृष्टया दारिद्र्य असल्यामुळे दुस-या लग्नासाठी त्याला कुणी विचारयलाही तयार होत नाही. त्याच्या भावनेपेक्षाही त्याची आर्थिक स्थिती हाच घटक लग्नाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. तात्याबाला तो म्हणतो, "दामाजीचा पत्त्या न्हाई न्हवं का. आन् त्येच्याशिवाय लोक बात करायला तयार न्हाईत. म्होतराची करायची म्हनली तरी चार-चारसे आन् पाच-पाचसे मागालेयत."५२ यात त्याची लग्नाची उत्सुकता दिसते पण परिस्थितीने निर्माण केलेली अगतिकताही दिसते.

यावर तोडगा म्हणून मुलीचे लग्न करणे व त्या पैशात स्वत:चे दुसरे लग्न करणे एवढा एकच पर्याय त्याच्यासमोर असतो. पण तसे ही कुठे जमत नाही. तो घुमऱ्याकडे लग्नासाठी जातो पण तिथेही मुलगी लहान असल्याने नकारच मिळतो. तो कमी पैसे घ्यायलाही तयार असतो पण तरीही त्याचे प्रयत्न सफल होत नाहीत. अखेर मुलीला लवकर लग्नायोग्य करण्यासाठी तिला खारीक-खोबरे खाऊ घालण्याचे सोपाना ठरवितो. आपले दु:ख दाबून टाकतो. त्याचे दु:ख त्याला बोलूनही दाखविता येत नाही. काळाची वाट पहाण्या-शिवाय त्याच्या हाती काहीच रहात नाही.

"लागेबांधे" कथेमधील तात्याबासुध्दा विधुराचेच आयुष्य जगतो आहे. लहान बाबल्याला मागे सोडून तात्याबाची बायको निधन पावते. तात्याबाने

वयाची परिस्तिशी गाठली आहे. कुणी कितीही आग्रह केला तरीही तो दुस-या लग्नाला अजिबात तयार होत नाही. आपल्या मृत पत्नीच्या आठवणींवर तो दिवस काढीत आहे.

तात्याबाच्या पत्नीच्या मृत्यूने तर त्याला दु:खी केलेले आहेच. शिवाय आणखी एक वादळ त्याच्या आयुष्यात उठते. अर्थात हे गैर-समजूतीवर आधारलेले असते. पण त्याचा क्लिक्षण त्रास तात्याबाला होतो. परिणामी घर सोडून तो रानात रहायला जातो. त्याचा बाबल्याआणि चुलती सरस्वती यांचा एकमेकांना लळा लळा असतो. कुटुंब एकत्रित असल्यामुळे आईविळे पोर म्हणून चुलती बाबल्याचा मनापासून संभाळ करते. त्याला आईची आठवणही येउ देत नाही. तात्याबाचे भावजयीशी वागणेही मनमोकळे असते. याचाच गैरअर्थ गोपाळ घेतो आणि सरस्वतीला मारझोड करतो. तात्याबा कष्टी होतो की आपल्यामुळेच हे घडले आहे. प्रायश्चित्त म्हणून तो रानात रहायला जातो.

दुस-या लग्नाचा प्रस्तावही बाबल्याच्या भवितव्यासाठी त्याने फेटाळून लावलेला असतो. समजा लग्न केले आणि दुसरी बायको मुलाला त्रास देउ लागली तर ते अवघड होईल याची जाणीव तात्याबाला असते. त्यासाठी वैयक्तिक भावनांचा तो विचार करीतनाही. तो म्हणतो, "आता कसंबी केलं तरी कुनाचा तरी वनवास व्हनारच हाय. लगीन केलं तर त्येचा व्हईल, न्हाई केलं तर माजा हुईल. मंग हूजा आपलाच झाला तर."[५३] भावाने घेतलेला संशय तात्याबाच्या जिव्हारी लागतो. पुढे भावालाही कळून आल्यावर बरेही वाटते. बाबल्याला सुखात पहाणे एवढा एकच जीवित-उद्देश्य तात्याबाला उरलेला आहे. त्याच्यासाठी त्याच्या मनाची घालमेल होते. कुटुंबाच्या अब्रूचा, प्रतिष्ठेचा प्रश्न असल्याने भावाने अबोला धरला

नकार दिला जातो. त्यामुळे विश्वनाथजवळ नाराज होण्याशिवाय दुसरे काही नाहीच. त्यामुळे त्याची उदासी अपरिहार्य आहे. बायको हक्काची असताना त्याने जर थोडी जबरदस्ती केली असती तर ती अनैसर्गिक वाटली नसती. पण तो ही कोमटपणे नुसते पहात रहातो. थोडेही धाडस करणे त्याला शक्य होत नाही. अगदी एकांतात सुध्दा. त्याची अगतिकता त्याला काही करु देत नाही. हे स्पष्ट दिसते.

बायकोच्या मृत्यूनंतर मुलाची आबाळ होऊ नये, त्याच्या भाळी वनवास लिहिला जाऊ नये म्हणून स्वत:च्या शारीरसुखाकडे दुर्लक्ष करणारा आणखी एक बाप "मळणी" कथेत दिसतो. पत्नीच्या मृत्यूने तो अगतिक झालेला आहे. त्यालाही दुसरेपणाच्या लग्नासाठी सतत आग्रह होतो. फार संयमाने तो नकार देतो. मुलाच्या मायेपोटी तो असहाय झालेला आहे. त्याला कुणालाही दुखवायचे नाही. लग्नाच्या विचाराला फाटा देताना त्याला वेदना होतातही. पण हे सोसणे किती आवश्यक आहे हे त्याला समजून चुकलेले असते. तो बोलूनही दाखवितो की, "माजं असं एक्लपायाचं काम. पोराचं वय हे असलं. उंद्या म्या लगीन केलं, बाई घरात आली अन पोराचा ताप कराया लागली मंजी १ उगं आगीतून निघून फुफाटयात पडल्यावानी व्हायचं मला."[५५] नव्या येणाऱ्या बायकोवर त्याचा विश्वास नाही तो केवळ मुलाच्या प्रेमापायीच. तो स्वत:चे सुख बाजूलाच ठेवतो.

अचानक मळणी चालू असताना माळ्याची बायना येते. तेव्हा तिच्याविषयीच्या आकर्षणाने क्षणिक तो हे जग विसरतो. तिची आस्थेवाईकपणे चौकशी करतो. तिला खायला देतो. वारंवार येण्या-विषयी सांगतो. मात्र ती जाताच त्याला परिस्थितीचे भान येते. आपल्या शारीरातील अतृप्तीचा जोर आपणाला असे वागायला भाग पाडतो हे

तरी तो कुठेही वाच्यता करीत नाही. एकट्यानेच सगळे सोसतो. आपल्यावर घेतलेल्या संशयाचे तो स्पष्टीकरणही देत नाही. ग्रामीण समाजात अशा स्पष्टीकरणाला वावही नसतो आणि अर्थही नसतो. स्पष्टीकरणाचा अर्थ इथे आत्मसमर्थनच होतो. त्यामुळे बचाव आपोआपच दुय्यम ठरतो. वैयक्तिक सुखाला त्याला पारखे व्हावे लागते. आपल्या इच्छा आकांक्षाना आपल्याच पायाखाली तुडवावे लागते. डावलावे लागते.

नुकतेच लग्न झालेले विश्वनाथ आणि चंद्रभागा अवघ्या पंधरा दिवसांच्या सहवासानंतर एकमेकांपासून दुरावतात आणि दु:खी होतात. अचानकपणे चंद्रभागा रानामध्ये बांधावर उभी असलेली दिसते आणि त्याला विलक्षण आनंद होतो. एकाच गावात रहाणारे दोघे एकमेकांपासून खूप दूर जातात. [illegible] मनाने नव्हे. चंद्रभागा परंपरागत ग्रामीण स्त्री प्रमाणे दैववादी विचारसरणीची आहे. मात्र विश्वनाथला हे मान्य नाही. तो चिडून म्हणतो, "आसला कसला भोगवटा हाय तरी म्हनावं ? एका गावात असून आसं परक्यावानी वागायचं आलं !"[54] इथली विश्वनाथची चीड स्वाभाविक आहे. त्याचा जो कोंडमारा होत आहे त्याला कुठे तरी वाट करून देणे भागच आहे. परावलंबीपणामुळेच विश्वनाथ अगतिक होतो. दोघेही हे दिवस जातील या आशेवर बसले आहेत. इथली सारीच मुले आई बापांच्या इतकी ऐकण्यात कशी असा प्रश्नही पडतो. दोन व्याहयांच्या भांडणात मुलांची भावजीवनं उध्वस्त होतात. विश्वनाथच्या असहायतेचे बीज परंपरागत रूढीने दिलेल्या नात्याच्या दु:खात आहे. मान-अपमान माणसापेक्षाही महत्त्वाचा मानला गेला की असली दु:खे अटळपणे समोर उभी रहातात. त्यांच्या स्वीकार अपरिहार्यपणे करावाच लागतो.

एकांतात निदान एक रात्र तरी तिने रहावे असे त्याला वाटते. त्याच्यातला पुरुष इथे जागा होतो. पण ते ही घडत नाही. भीतीपोटीच

त्यालाही समजते. तो तसे बोलूनही दाखवितो. मुलगा रागावतो तेव्हा त्याला समजावितांना तो आपली अगतिकता प्रकट करतो. हे समजून घेण्याइतका शहाणपणा मुलाला आलेला नाही. तरीही त्याला कुठेतरी प्रकट करायचे आहे. म्हणून तो बोलतो. हीच त्याची अगतिकता आहे. चार-चौघात या गोष्टीचा स्वीकार तो करु शकत नाही. तो मुलाला म्हणतो, "ल्हान्या, रागावलास व्हय रं माज्यावर ? ती एक रुसून गेली माज्यावर अन तू बी असं कराय लागलास तर म्या कुनाच्या तोंडाकडं बगावं ? म्या मोप कोसीस करतो रं. तुज्या जिवाला तोसीस लागूनी म्हनून जपतो रं. पर काय करु ? म्याबी एक मानूस हाय. मला बी माजं...."[५६] त्याच्या असहायतेचा हा सगळ्यात मोठा पुरावा आहे. जगण्याचे ध्येय फक्त मुलगा आणि त्याचे सुख, भवितव्य हाच आहे. स्वत:चे सुख ही गोष्ट त्याला गौणच मानावी लागते. इथेच त्याची अगतिकता जन्म घेते.

परिस्थितीने आलेले कुचंबलेपण:

परिस्थितीने गरीब आणि शारीराने अधू असलेल्या सुका सारख्या माणसाच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेणारे सुदाम पाटील ग्रामीण परिसरात दिसतात. "पौरुष" कथेमध्ये याच प्रवृत्तीचे चित्रण केलेले आहे.

केव्हांकेळी परिस्थितीच त्याला अशा रीतीने अडचणीत आणते की त्याचे काहीचालत नाही. उलट तो जास्त जास्तच संकटात गुंतत जातो. किराणा दुकान घालून देऊन पाटील त्याला पैसे मिळविण्याचे साधन उपलब्ध करुन देतात. गरजा कधी भागतच नसतात. त्या पुनरुद्भवी असतात. आर्थिक गरज भागली की थोडीशी स्थिरता येते. हळू हळू त्याची शारीराची भूक जागी होऊ लागते. त्यामुळे लग्नाचा विचार क्रमानेच येतो.

आपली हौस भागविण्यासाठी पाटील त्यांना हव्या असलेल्या रूपवान कलावंतीणीशी सुकाचे लग्न लावतात. इथेच त्याच्या दुःखाची सुरूवात होते. सर्वच दृष्टीने अधू असलेला सुका कसलाच प्रतिकार करु शकत नाही. असहायपणे जे जे होईल ते ते पहाणेच फक्त त्याला शक्य होते. गरिबीत रूपवान बायको सांभाळणे म्हणजे जिवाला तात लावून घेण्यासारखेच असते. पाटलांशी तिचे संबंध असतात हे सुकाला समजते. निवेदक सर्व सोडून त्याच्याबरोबर येण्याविषयी सुचवितो तेव्हा सुका थंडपणाने म्हणतो, "जाऊ द्या की. उगच कशाला रिकाम्या कटकटी वाढवीत बसायच्या ?"[५७] एवढे होऊन परिस्थितीने सुका थंड, सोशिक बनलेला आहे. शरण गेलेला आहे. दुस-या लग्नाच्या वेळीही त्याची ही प्रतिक्रिया अधिक व्यवहारी होते. आपले लग्न म्हणजे सुदाम पाटलाची सोय हे तो जाणून असतो. त्याने या कटूसत्याचा स्वीकार केलेला असतो. "रोटी तुकड्याची तर सोय व्हते की." एवढीच त्याची माफक अपेक्षा असते. रोटीच्या सोयीपाई अडू जाते. ह्याची खंत त्याला वाटत नाही. बाई येईल. पाटलाकडे राहील. आपलेही पोट भागेल एवढा व्यवहारी विचार करण्यापर्यंत तो निगरगट्ट होतो.

त्याची दुसरी बायको मात्र त्याच्याशी एकनिष्ठ असते. पाटलांना ती हस्तक्षेप करु देत नाही. त्याचे पौरुष जागे होते. पाचशे रूपये पाटलाच्या तोंडावर फेकून तो सुटका करुन घेऊ इच्छितो. पण निवेदकही असहाय असतो. त्याला पैसे मिळत नाहीत. त्याची सुटका होण्याची शक्यता निर्माण होते न होते तोच तोही रस्ता बंद होतो. तीही बायको पसार होते. पाटलाचा खून करण्याचा विचारही त्याच्या मनात येतो आणि बारगळतोही. दरवेळी होणारे नवे लग्न त्याच्यासाठी नवे संकट ठरत जाते आणि तो जास्तजास्त असहाय होत जातो. बोराडेंच्या पुरुषांमधला हा

एक वेळाच अगतिक झालेला पुरुष आहे. हाती सत्ता, खिशात पैसा आणि मनगटात जोर असणारे सुदाम पाटील सुकासारख्या गरीबाच्या जीवनाशी जीवघेणा खेळ खेळतात. सुकाचे दु:ख फार क्लेशाकारक आणि त्याच्या अस्तित्वालाच सुरुंग लावणारे आहे. इथला निवेदक मात्र म्हातारीला शब्द देण्याशिवाय काहीच करत नाही. त्यामुळे त्याची असहायता पराकोटीला जाते. तो नुसता पहात रहातो आणि केळोवेळी लग्नाची परवानगी देत रहातो. हे पटत नाही. तो ही पुरुष म्हणून असहाय असेल पण तो दुबळा ठरावा हे पटत नाही. त्याचा हा दुबळे-पणाच सुकाच्या दु:खाच्या खाईत लोटतो.

वृध्दत्वामुळे झालेली कुचंबणा:

उतरत्या वयामुळे बापाला मुलापुढे अगतिक व्हावे लागते. त्याचा निर्णय पटत नसला तरी मान्य करुन घ्यावा लागतो. "सौदा" कथेमध्ये अगतिक झालेले यदाण्णा मुलाच्या अविचारापुढे हतबल होतात. बैल विकून लग्न करावे ही गोष्ट यदाण्णासारख्या हाडाच्या शेतक-याला पटणेच शक्य नाही. पण किसनापुढे त्यांचे काहीही चालत नाही. त्यांच्या मनावर सतत ताण येत रहातो तो मुलाच्या अघटित वागण्याचा व बेताल बोलण्याचा.

शेती हाच मुख्य व्यवसाय. जनावरे तर प्राणापेक्षाही प्रिय असतात. त्यांच्याशिवाय शेती संभवतच नाही. पण मुलाला लग्नाची घाई झालेली आहे. त्याच्याबरोबरीच्या मुलांची लग्नं झाली आहेत. यदाण्णा यासाठी कर्ज काढायलाही तयार होतात पण कुणी कर्ज द्यायलाही तयार नाहीत. एकीकडे मुलाचे लग्न नाही म्हणून कमीपणा तर दुसरीकडे

बैलांना बाजार दाखवावा लागतो त्याचे दु:ख आहे. त्यातही एकच बैल विकून पैसे घ्यावेत तेवढेच पाहुण्यांना द्यावेत हा विचारही मुलगा किसनला मान्य नाही. लग्नाच्या बाबतीत मुलाने चालविलेली घाई दोन पिढयातील अंतर बोलून दाखविते, यदाण्णा किसनाला सुनावतात, "एवढा कसा लग्नाच्या भरीला पडलास म्हणावं १ लगीन म्हनलं की बापाम्होरं आमची जीभ उचलत न्हवती, आन हितं तर गुडघ्याला बाशिंग बांधून बसलास तू!"

यदाण्णांच्या भावनेचाच हा सौदा ठरतो. अवघ्या तीनशे रुपयावर बैलांचा सौदा होतो. यदाण्णांचे काहीही चालत नाही. त्याच्या सोशिकतेचाही अंत पाहण्याचा प्रकार दिसतो. पोटच्या मुलापुढे बापाचे अगतिक, असहाय होणे मनाला विषण्णता आणते एवढे मात्र नक्की.

सारांश:
======

रा.रं. बोराडे यांच्या कथांमधील स्त्रिया कुटुंबामध्ये अनेक प्रकारच्या भूमिका बजावताना दिसतात. आई, सून, मुलगी, नणंद, भावजय, सासू वगैरे. कधी नात्यांच्या आपलेपणामुळे त्यांच्यावर सतत दबाव येत रहातो. त्या कधी बोलत नाहीत. बंड करीत नाहीत. जेजे सोसता येईल तेते मुकाटयाने सोसतात. त्याची कुठेही वाच्यता करीत नाहीत. विशेषत: "नातीगोती" या संग्रहातील सिमंता, रुक्मिणी, जनाई, गंगा, सावित्री, सुमित्रा, शेवंता, सगुणा, शकुंतला, या स्त्रिया सतत गप्प रहातात. कधी नवरा बायको काळी म्हणून नाकारतो तरीही ती विरोध करीत नाही. अचानक जावई मुलीसह येतो. जनाईच्या दुखण्यापेक्षाही जावयाचा मानपान महत्त्वाचा ठरतो. गंगाच्या डोहाळजेवणात तिच्या नव-याला घडयाळ हवे म्हणून वातावरण तंग होते. सासू सुनेला नदीवर चोळी हरविली म्हणून मारते. बाप गरीब म्हणून सासरी त्याची होणारी उपेक्षा सुमित्रा सोसते. तर शेवंताला

मूल नाही. तरी बहीण सवत म्हणून नको असते. कधी भाऊच बेरकीपणाने बहिणीला वागवितो. तर दुष्काळामुळे शाकू सारखी गरीब मुलगी माहेराला दुरावते. अशा अनेक अंगाने स्त्री या घटकाची सतत कुचंबणा होत रहाते.

"मळणी" संग्रहातील स्त्रियांचे कुचंबलेपण बहुअंगी आहे. कधी परिस्थितीच पुतळासारख्या मुलीला अगतिक करते. सुगंधाला नवरा हवा असतो पण एकीकडून बापूसाहेब आणि दुसरीकडून माहेर अशा दुहेरी पेचात ती सापडते. चंद्रभागाचे एकूणाच नांदणे फक्त पंधरा दिवसाचे होते. व्याहयांच्या भांडणात तिचे भावजीवन कोमेजून जाते. पद्माचा नवरा अचानक मरतो आणि एकटेपणाचे जीवघेणे दुःख केवळ त्याच्या मरत्यावेळेचा शब्द पाळण्यासाठी आयुष्यभर भोगत रहाते. आजारी भावाच्या समाचा-राला गेलेली शेवंता रोजगार बुडवून जाते आणि उपाशीपोटीच पायी चालत रडत येते. मुले आणि वैधव्य या दोघांचीही जपणूक यशोदा करते. प्रसंगी भाऊही मदतीला येऊ शकत नाही. त्यात ती अगतिक होते.

आणाखी एक वैशिष्टय म्हणजे स्त्रियांच्या काम जीवनाच्या अतृप्तेच्या तीन कथाही बोराडे लिहितात. "भोग", "उंबरठा" आणि "खेळ". वृध्दत्वाकडे झुकलेल्या नव-याकडून शारीरसुख मिळत नाही म्हणून कष्टी होणारी, शारीरबळ कमी करण्यासाठी अपरात्री जात्यावर दळायला बसणारी सरस्वतीही असहायच आहे. मूल नाही म्हणून दुःखी असणारी कृष्णाबाई दौलतीकडे आकर्षित होते. त्या स्वप्नावस्थेत रहाते. पण वास्तवाची जाण येताच तीही दुःखी होते. सैरभैर होते. समाजबंधनाच्या जाचामुळे ती व्यभिचारापासून दूर होते. तर "खेळ" मधल्या गुजाबायचा नवरा ऐन तारुण्यात परांगंदा होतो. मुलाशी खेळतानाच तिच्या वासना

जाग्या होतात. ती हिंस्त्र होते. अगतिक होते.

अशा प्रकारे अनेकअंगाने ग्रामीण समाजातील स्त्रियांचे कुचंबलेपण बोराडे यांनी चित्रित केलेले आहे.

रा. रं. बोराडे यांच्या कथेतील स्त्रिया जशा दु:खाला उराशी कवटाळून संसार सावरणाऱ्या आहेत तसे या कथांमधील पुरुषही आपली असहायता लपवून प्रपंच करणारे आहेत. वेगवेगळया कारणांनी हे पुरुष अगतिक होतात. प्रसंगी एकांतात डोळयातून पाणीही काढतात. पण चार-चौघात मात्र हे दु:ख प्रकट करीत नाहीत. खरे तर त्यामुळेच त्यांच्या दु:खाची तीव्रता अधिक वाढत जाते. जगण्याचे सगळेच मार्ग खुंटले तरी जीवनावर ते नाराज होत नाहीत. प्राप्त परिस्थितीमध्ये जगत रहाणे एवढेच त्यांना ठाऊक आहे.

यामध्ये पहिल्या बायकोच्या मृत्यूनंतर अगतिक झालेले पण तरीही मुलांच्या भल्यासाठी स्वत:च्या शारीरसुखाकडे दुर्लक्ष करणारे "झाळ" मधील बाबाराव आहेत. "मुरडण" मधील सोपानलाही एक मुलगी आहे. तो ही दुसऱ्या लग्नाचा विचार दूर करतो. तर "मळणी" मधील तात्याबाही मुलाच्या नशिबी वनवास नको म्हणून दुसरे लग्न करीत नाही. या सगळयांनाच आपल्या पहिल्या बायकांची आठवण येते. ते गलबलतातही. पण भावनेच्या आहारी जाऊन दुसरे लग्न मात्र करीत नाहीत. काही वेळा लोक काय म्हणतील ? हा समाजमनाचा दबावही त्यांच्या मनावर येतो.

"सौदा" मधील यदाण्णांनाही दारिद्र्याने आणि वृध्दत्वाने हतबल केलेले आहे. "बांध" मधला विश्वनाथ आणि "घालमेल" मधला सोपान यांना बायकोचा सहवास हवा असतो. तो मिळत नाही. या ठिकाणी वडील-माणसांची प्रतिष्ठा आड येते. "नेट" मधला तात्याबा दारिद्र्यानेच व्यंकाच्या लग्नाची गोष्ट बहिणीजवळ न काढताच निराश होऊन परततो. "माघारी"तील

किसना देशमुखाच्या वासनेच्या भीतीने बायकोला तिची इच्छा नसतानाही माहेरी पाठवितो. "पौरुष" मधल्या सुकालाही सुदाम पाटलाच्या क्रूरतेने अगतिक केलेले आहे.

बोराडेंचे हे पुरुष अगतिक होतात पण कुठलाही आततायीपणा करत नाहीत. योग्य अयोग्य कळूनही ब-याचदा त्यांना गप्प रहावे लागते. कधी परिस्थिती त्यांना गप्प करते तर कधी दारिद्र्य. आर्थिक विषमतेतच त्यांच्या दु:खाची बीजे आहेत. मराठीतील बहुतेक समीक्षकांनी बोराडयांच्या स्त्रीविषयक चित्रणाचे कौतुक केलेले आहे. पण पुरुषांची जी असहायता योग्य शब्दात त्यांनी व्यक्त केली आहे. त्याकडे फारसे लक्ष दिले गेलेले नाही. उत्कृष्ट कुटुंबचित्रण करणारे बोराडे पुरुषाच्या असहायतेच्या केंद्रस्थानीच लक्ष केंद्रित करतात आणि समृध्द आशयाच्या कथा लिहितात.

## - संदर्भ -


१) बोराडे रा.रं., "गाठोडं", "नातीगोती", लोकवाङ्.मय गृह, मुंबई-२५, पृष्ठ ९.

२) कागणे मा.ना., "नातीगोती: एक टिपण" प्रतिष्ठान, औरंगाबाद, जुलै-ऑगष्ट, १९७७, पृष्ठ १५.

३) बोराडे रा.रं., "डोहाळ जेवण", नातीगोती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई २५, पृष्ठ १९.

४) तत्रैव, तत्रैव,

५) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ, २२.

६) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ २३.

७) बोराडे रा.रं., "माझे कथालेखन: काही विचार", प्रस्तावना, नातीगोती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ११.

८) बोराडे रा.रं., "रूसवा", नातीगोती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई २५, पृष्ठ २६.

९) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ २७.

१०) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ २८

११) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ २९.

१२) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ३०.

१३) बोराडे रा.रं., "सिमंता", नातीगोती, लोकवाङ्.मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ३९.

१४) कुरुंदकर नरहर, "प्रस्तावना", वानकळा, अमेय प्रकाशन, नागपूर, पृष्ठ ९.

१५) बोराडे रा.रं., "सिमंता", नातीगोती, लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ३५.

१६) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४१.

१७) बोराडे रा.रं., "बांध", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पृष्ठ ५७.

१८) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ६१.

१९) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ६३.

२०) हातकणंगलेकर म.द. "ग्रामीण कथा", मराठी कथा: रूप आणि परिसर, सुवर्ण प्रकाशन, पुणे, पृष्ठ ४६.

२१) बोराडे रा.रं., "माझे कथालेखन काही विचार प्रस्तावना नातीगोती", लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ११.

२२) बोराडे रा.रं., "धुणं", नातीगोती, लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ४५.

२३) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४६.

२४) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ४८.

२५) बोराडे रा.रं., "माहेर", नातीगोती, लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृ.५७.

२६) कुरुंदकर नरहर, प्रस्तावना, वानकळा, अमेय प्रकाशन, नागपूर.

२७) बोराडे रा.रं., "नातं", नातीगोती, लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृष्ठ ६०.

२८) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ६१.

२९) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ६५.

३०) बांदिवडेकर चंद्रकांत, "कथा", मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, १९५०-७५, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पृष्ठ १५०-५१.

३१) बोराडे रा.रं., "उंबरठा", मळणी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, पृष्ठ १४१.

३२) कुलकर्णी दु.शं., "रा.रं. बोराडे यांची कथा", प्रतिष्ठान, औरंगाबाद, फेब्रुवारी, १९६८, पृष्ठ १५.

३३) कुरुंदकर नरहर, प्रस्तावना, वानकळा, अमेय प्रकाशन, नागपूर.

३४) बोराडे रा.रं., "मुराळी" नातीगोती, लोकवाङ्मय गृह, मुंबई २५, पृ.७०.

३५) कोत्तापल्ले नागनाथ, "मुलाखत रा.रं.बोराडे यांची", ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पृष्ठ. १२४.

३६) बोराडे रा.रं., "धाक", नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृ.८६.

३७) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ८४.

३८) बोराडे रा.रं., "माझे कथालेखन, काही विचार" प्रस्तावना नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृष्ठ ११,१२.

३९) बोराडे रा.रं., "रुसवा", नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृ.२७.

४०) बोराडे रा.रं., "माठोडं", नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृष्ठ ८.

४१) बोराडे रा.रं., "मी आणि माझे साहित्य", महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ग्रामीण साहित्य विशेषांक, जुलै-डिसेंबर, १९८० अंक २१४-१५, पृष्ठ १०९.

४२) बोराडे रा.रं., "बोध", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३०, पृष्ठ ५७.

४३) बोराडे रा.रं., "मांडव", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३०, पृष्ठ ८०.

४४) बोराडे रा.रं., "भेग", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३०, पृष्ठ १०.

४५) बोराडे रा.रं., तत्रैव, पृष्ठ १३.

४६) कोत्तापल्ले नागनाथ, "मुलाखत रा.रं. बोराडे यांची" ग्रामीण साहित्य स्वरूप आणि बोध, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३०, पृष्ठ १२३.

४७) बोराडे रा.रं., "खोळ", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३०, पृष्ठ ६७.

४८) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ६७.

४९) बोराडे रा.रं., "खेळ", मळणी मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३० पृ.७३.

५०) बोराडे रा.रं., "झाळ", नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृ.१०२-

५१) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ १०४.

५२) बोराडे रा.रं., "मुरडण", नातीगोती, लोकवाङ्मयगृह, मुंबई २५, पृ.१०

५३) बोराडे रा.रं., "लागेबांधे", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३० पृष्ठ १९.

५४) बोराडे रा.रं., "बांध", मळणी, मेहता पब्लिशिंग हाउस, पूणे ३० पृ.५७

५५) बोराडे रा.रं., "मळणी", मळणी, तत्रैव, पृ.८३.

५६) तत्रैव, तत्रैव, पृष्ठ ८६.

५७) बोराडे रा.रं., "पौरुष", मळणी मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे ३० पृष्ठ ११२.

५८) बोराडे. रा.रं. "सौदा", मळणी, तत्रैव, पृष्ठ १४९.